रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १९१
www.ramprahar.com

◆ बुधवार, २८ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## आयटीआयमध्ये पीएम सेतू योजना राबवली जाणार

**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाची बैठक मंगळवारी (दि.२७) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे (आयटीआय) पीएम सेतू योजनेंतर्गत आधुनिकीकरण करण्याच्या योजनेस मान्यता देण्यात आली. कुशल मनुष्यबळाची मागणी आणि पुरवठा यांच्यातील तफावत भरून काढण्यासाठी आयटीआय आधुनिकीकरणाची ही योजना आहे. याशिवाय वेगवेगळ्या कारणांसाठी भाडेपट्ट्याने देण्यात येणाऱ्या शासकीय जमिनींचा कालावधी वाढवण्याचा निर्णय या वेळी घेण्यात आला. विविध संस्थांना व्यावसायिक प्रयोजनास्तव ३० वर्षांसाठी भाडेपट्ट्यांवर दिल्या जात होत्या. अशा जमिनी आता प्रथमतः जास्तीत जास्त ४९ वर्षापर्यंत व त्यानंतर कोणत्याही अटी व शर्तीचे उल्लंघन झालेले नसल्यास पुन्हा एकवेळ जास्तीत जास्त ४९ वर्षांच्या मर्यादेत नूतनीकरण करून भाडेपट्ट्याने देता येतील.

### अंतरंग

शिवसेनेच्या सोनल घरत यांचा उमेदवारी अर्ज मागे/३
वातावरणीय बदलाने कडधान्य आणि फळपिकांना धोका/५
पोयनाड येथील क्रिकेट स्पर्धेत पोलिसांचा संघ विजेता/८

# पनवेलमध्ये शेकापला हादरा!

## ज्येष्ठ नेते विश्वास भगत कार्यकर्त्यांसह भाजपत दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद आणि पनवेल पंचायत समिती निवडणूक रणधुमाळीमध्ये पनवेल तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाला हादरा बसला आहे. पळस्पे जिल्हा परिषद गटातील उसर्ली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते विश्वास भगत यांनी असंख्य समर्थक व कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

उसर्ली येथील दीप सिटी येथे कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा झाला. या भव्य पक्षप्रवेशामुळे पळस्पे मतदारसंघातील शेकापची संपूर्ण राजकीय घडी विस्कटली आहे.




या कार्यक्रमात शेकाप नेते विश्वास भगत यांच्यासोबत ग्रामपंचायत सदस्य संजय भगत, अर्चना भगत, माजी सरपंच करुणा भगत, हरेश्वर भगत, राकेश भगत, अमित भगत, मोहन भगत, डेरवली पंच कमिटीचे अध्यक्ष संतोष शेळके, रामदास शेळके, विविध सोसायट्यांचे पदाधिकारी आणि असंख्य शेकाप कार्यकर्त्यांनी 'कमळ' हाती घेतले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात प्रकल्पग्रस्त व भूमिपुत्रांच्या घरांवर सिडकोकडून अन्याय होत असेल, तर तो कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही, असे ठामपणे सांगितले. अन्यायाविरोधात कडाडून विरोध करण्याची आमची भूमिका पूर्वीपासूनच राहिली असून त्यासाठी आम्ही व आमचे कार्यकर्ते पूर्णपणे सज्ज आहोत. वाढत्या नागरीकरणामुळे परिसरातील गावांचे स्वरूप बदलत आहे. या भागात नैना प्राधिकरण येत आहे. त्या अनुषंगाने नागरिकांच्या हिताला बाधा पोहचवणाऱ्या चुकीच्या निर्णयांना कायम विरोध केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सिडकोकडून राहत्या घरांवर प्लॉट टाकण्याचा कोणताही प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे नैना प्रकल्पामुळे नुकसान होऊ नये यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे सांगत अटल सेतू व विमानतळामुळे हा परिसर थेट मुंबईशी जोडला गेला असून मुंबईपेक्षाही अधिक सुविधा या भागात उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याचा विश्वास व्यक्त करत येत्या निवडणुकीत नागरिकांनी आम्हाला साथ द्यावी. भविष्यातही नागरिकांच्या हिताचे संरक्षण करण्याची जबाबदारी आम्ही पार पाडू, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली.

पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी शेकापच्या बिकट अस्वस्थेवर भाष्य केले. विश्वास भगत यांच्या भाजप प्रवेशामुळे शेकापला आता पोलिंग एजंट आणि बूथवर बसायला कार्यकर्ते मिळतील का अशी परिस्थिती या भागात झाली आहे, असा टोला त्यांनी शेकाप पुढाऱ्यांना लगावला तसेच यापुढील काळात विश्वास भगत हे आमदार प्रशांत ठाकूर यांचे खंदे कार्यकर्ते म्हणून ओळखले जाणार आहेत, असेही त्यांनी अधोरेखित केले. (पान २ वर..)

## भूसंपादनासह सर्व परवानग्यांची कार्यवाही प्रकल्प सुरू होण्यापूर्वी पूर्ण करा -मुख्यमंत्री

### मुंबई आणि नवी मुंबई विमानतळ मेट्रोने जोडण्यास मान्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ दरम्यान मेट्रो मार्गिका ८च्या ३५ किलोमीटरच्या जोडणीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आयोजित मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

यासोबतच ६६ किमी लांबीचा नाशिक शहर परिक्रमा मार्ग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून करण्यास आणि गडचिरोली जिल्ह्यात खनिज वाहतुकीसाठी नवेगाव मोर ते सुरजागड या चार पदरी सिमेंट काँक्रीट महामार्गाच्या सुधारित आखणीस मान्यता देण्यात आली.

पायाभूत सुविधा प्रकल्पाला आवश्यक असलेले भूसंपादन आणि सर्व प्रकारच्या परवानग्या प्राप्त करून घेण्याची कार्यवाही प्रकल्प सुरू होण्यापूर्वी पूर्ण करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी दिले तसेच कुठलाही पायाभूत सुविधा प्रकल्प भूसंपादनानंतर पुढील तीन वर्षात पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पायाभूत सुविधा प्रकल्पांची कामे वेळेत पूर्ण करण्यात यावी. कुठल्याही परिस्थितीत कामे रेंगाळू नये, कारण काम पूर्ण होण्यास विलंब लागल्यास प्रकल्पाच्या खर्चामध्ये वाढ होते. नागपूर ते गोंदिया, भंडारा ते गडचिरोली या समृद्धी महामार्गाच्या विस्तारित कामांना गती द्यावी. प्रकल्प कार्यादेश देतानाच प्रकल्प पुढील तीन वर्षात पूर्ण करण्याची अट करण्यात यावी.

प्रकल्प विहित कालमर्यादेत पूर्ण झाल्यास कंत्राटदाराला प्रोत्साहन मूल्य आणि विहित कालावधीपेक्षा जास्त वेळ लागल्यास दंडाची व्यवस्था असलेली 'ऑटो मोड' वरील यंत्रणा विकसित करावी. गडचिरोली जिल्ह्यातील महामार्गाचे काम करीत असताना रस्त्याच्या बाजूला गॅस वाहिनीसाठी जागेची उपलब्धता असल्याची खात्री करावी. भविष्यात सुरजागडपर्यंत गॅस वाहिनी कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यासाठी आतापासून जागेची तरतूद महामार्गाच्या बाजूला करण्यात यावी, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ.पी. गुप्ता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व्यवस्थापकीय संचालक डॉ. अनिल गायकवाड, महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळ व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित आदी उपस्थित होते. या वेळी अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) मनीषा म्हैसकर आणि सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सादरीकरण केले.



**मेट्रो दृष्टिक्षेपात...**

*छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मेट्रो मार्गाची एकूण लांबी ३५ किलोमीटर, भूमिगत मार्ग ९.२५ किलोमीटर, उन्नत मार्ग २४.६३६ किमी, एकूण स्थानके २०, सहा स्थानके भूमिगत, १४ स्थानके उन्नत असतील. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल स्थानक २ ते घाटकोपर (पूर्व)पर्यंतची स्थानके भूमिगत असणार आहेत.*

## सामाजिक कार्यकर्ते अनिकेत ठाकूर, अमित ठाकूर यांच्या हातीही 'कमळ'

**उलवे नोड :** पनवेल आणि उरण तालुक्यात भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून विकासकामांचा धडाका सुरू आहे. या विकासकामांवर प्रभावित होऊन उरणमधील बामणडोंगरी येथील सामाजिक कार्यकर्ते अनिकेत ठाकूर आणि अमित ठाकूर यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.




आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून त्यांनी हा निर्णय घेतला असून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पक्षाची शाल देऊन भाजप परिवारामध्ये त्यांचे स्वागत केले.

या कार्यक्रमास भाजप नेते जितेंद्र म्हात्रे, अंकुश ठाकूर, रवींद्र पाटील, पनवेल तालुका उपाध्यक्ष अमित नाईक, किशोर कोळी, निलेश खारकर, वहाळ पंचायत समितीचे उमेदवार वितेश म्हात्रे, गव्हाण पंचायत समितीच्या उमेदवार जिज्ञासा कोळी, विराज देशमुख, प्रणय कडू, राकेश म्हात्रे, नंदकुमार ठाकूर, प्रणय कोळी यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## निवडक

### भारत-युरोपियन युनियन यांच्यात मुक्त व्यापार करार

**नवी दिल्ली :** भारत आणि युरोपियन युनियनमध्ये मंगळवारी (दि. २७) मुक्त व्यापार कराराची घोषणा करण्यात आली. या ऐतिहासिक करारानंतर युरोपियन युनियनच्या अध्यक्ष उर्सुला व्हॉन डेर लेयेन यांनी भारताचे कौतुक करीत जेव्हा भारत यशस्वी होतो तेव्हा जग अधिक समृद्ध होते, असे म्हटले आहे, तर हा करार म्हणजे सर्व करारांची जननी असल्याचा उल्लेख पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे.

### आजपासून संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**नवी दिल्ली :** संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला बुधवार (दि. २८)पासून सुरुवात होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाने अधिवेशनाला सुरुवात होईल. राष्ट्रपती लोकसभा आणि राज्यसभेला संयुक्तपणे संबोधित करतील. यानंतर गुरुवारी (दि. २९) केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आर्थिक सर्वेक्षण सादर करतील. पुढे १ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थमंत्री देशाचा महत्त्वपूर्ण अर्थसंकल्प सादर करणार आहेत.

## नेरळ परिसरात भीषण आग

### ३५० बकऱ्या, कबुतरांचा होरपळून मृत्यू

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील माणगाव परिसरात असलेल्या एका गोट फॉर्मला लागलेल्या भीषण आगीत तब्बल साडेतीनशे बकऱ्या आणि काही कबुतरांचा होरपळून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. प्राथमिक तपासात ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा अंदाज वर्तवण्यात येत असून या आगीत सुमारे दीड कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा फॉर्म मालकांनी केला आहे.

कर्जत-कल्याण राज्य मार्गावरील माणगाव तर्फे वरेडी ग्रामपंचायत हद्दीत सय्यद मोहम्मद तारीफ यांच्या मालकीचा राबिया गोट फॉर्म असून येथे मोठ्या प्रमाणावर विविध जातीच्या बकऱ्यांचे संगोपन व विक्री केली जाते. रविवारी मध्यरात्री सुमारे एक वाजण्याच्या सुमारास इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील इलेक्ट्रिक बोर्डमध्ये अचानक शॉर्टसर्किट होऊन स्पार्क झाला आणि क्षणार्धात आग भडकली. दाट धुरामुळे आणि आगीच्या तीव्रतेमुळे अनेक बकऱ्यांचा होरपळून मृत्यू झाला, तर शेड परिसरात असलेली काही कबुतरेही या आगीत मृत्युमुखी पडली.



घटनास्थळी नेरळ पोलीस तसेच कर्जत येथून अग्निशमन दलाचे वाहन दाखल झाले. केवळ बकरीची १० पिल्ले या आगीतून बचावली असल्याची माहिती फार्म मालकाने दिली. दरम्यान, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

## केंद्र आणि राज्य सरकार सर्व समाजांच्या विकासासाठी कटिबद्ध -आमदार प्रशांत ठाकूर

### खानाव येथे लाडक्या बहिणींचा मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी विविध कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून 'लाडक्या बहिणींची' खऱ्या अर्थाने काळजी घेत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली केंद्र आणि राज्य सरकार सर्व समाजांच्या विकासासाठी कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल तालुक्यातील खानाव येथे केले.

खानाव येथे सोमवारी (दि. २६) लाडक्या बहिणींचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. विविध सरकारी योजनांचा लाभ तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवणे ही भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मुख्य जबाबदारी आहे. आम्ही ही जबाबदारी पूर्वीही समर्थपणे पार पाडली आहे आणि यापुढेही ती तितक्याच निष्ठेने पार पाडू, असे त्यांनी आश्वस्त केले.

चिंधण परिसराच्या विकासासाठी भाजपने रस्ते, गटारे आणि समाजमंदिरे यांसारखी मूलभूत कामे पूर्ण केली असून पुढील काळातही विकासकामांचा ओघ अखंड सुरू ठेवण्यासाठी चिंध्रण जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार कमला देशेकर आणि पंचायत समिती गणातील उमेदवार अंकुश खैर यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.



या मेळाव्याला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस चारुशीला घरत, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, भाजप नेते एकनाथ देशेकर, शिवाजी दुर्गे, जिल्हा परिषदेच्या उमेदवार कमला देशेकर, पंचायत समितीचे उमेदवार अंकुश खैर, माजी सरपंच नरेश पाटील, रोशन पाटील, मोतीराम कोळी, रूपेश नागवेकर, शशिकांत दिसले, संजय तवले, उमेश वारदे, दिलीप तवले, विजय मुंडे, विलास भोपी, बाळाराम पाटील, लहू पाटील, सचिन मुंडे, अनंता कर्णूक, हरिश्चंद्र वारदे, समीर मुंडे, सचिन मुंडे, आत्माराम पाटील, गणेश टापरे, बाळाराम उसाटकर, रवींद्र पाटील दीपक नावडेकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. (पान २ वर..)

## ई-गव्हर्नन्समध्ये पनवेल मनपा राज्यात अव्वल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १५० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा कार्यक्रमांतर्गत ई-गव्हर्नन्स सुधारणांचा निकाल २६ जानेवारी रोजी जाहीर झाला. यामध्ये पनवेल महानगरपालिकेचे बाजी मारत प्रथम क्रमांक पटकावला आहे.

राज्यातील एकूण २९ महापालिकांनी या स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला होता. नागपूर, पुणे, पिंपरी चिंचवड, नवी मुंबई अशा मोठ्या व अनुभवी महापालिका स्पर्धेत असताना पनवेल महापालिकेने आपला झेंडा फडकवला असून याबाबत विशेष कौतुक होत आहे.



पनवेल महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या नेतृत्वात परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, संगणक विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या टीमने हा बहुमान पटकावला. या महापालिकेने यापूर्वीही १०० दिवसांचा प्रशासकीय सुधारणा कार्यक्रमामध्ये उत्तम कामगिरी बजावत तिसरा क्रमांक प्राप्त केला होता.

आयुक्त चितळे यांनी आयुक्तपदाची सूत्रे हाती घेतल्यावर लगेचच कार्यालयात ई-ऑफिस सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. त्याचप्रमाणे आयुक्तांच्या संकल्पनेतून विकसित करण्यात आलेल्या पनवेल कनेक्ट ॲपद्वारे नागरिकांना सुलभ सेवा प्रदान करता आल्या. याचा मोठ्या प्रमाणात फायदा या स्पर्धेसाठी झाला. या सर्व घटकांचे सादरीकरण १० जानेवारी रोजी महापालिकेने सादर केले होते. या स्पर्धेचे मूल्यांकन क्वालिटी कंट्रोल ऑफ इंडिया या राष्ट्रीय संस्थेने केले.

तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख यांची प्रेरणा व विद्यमान आयुक्त चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली परिवहन व्यवस्थापक गावडे, उपायुक्त खारगे यांच्या नेतृत्वाखाली विभागप्रमुख वर्षा पालवे व कर्मचारी यांनी या यशासाठी विशेष मेहनत घेतली.

### असा आहे प्रशासकीय सुधारणा कार्यक्रम

१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणांमध्ये महापालिकेचे संकेतस्थळ वापरण्यास सुलभ, सुरक्षित, अद्ययावत असणे, महापालिकेचे डॅशबोर्ड विकसित करणे, आपले सरकार अंतर्गत नागरिकांना विहित वेळेत सुलभतेने सेवा पुरवणे, कार्यालयात ई-ऑफिसचा प्रभावी वापर करणे, व्हॉटसॲप चॅटबोटचा वापर करणे, एआयचा वापर करणे, जीआरएसचा वापर करणे अशा घटकांचा समावेश होता. याचा पनवेल महापालिकेने प्रभावी वापर केला.

## सासरच्या जाचामुळे विवाहितेची आत्महत्या

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यात गेल्या काही महिन्यांपूर्वी वैष्णवी हगवणे प्रकरण घडलेले असताना आता उरळी कांचनजवळील सोरतापवाडी येथे सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितेने आत्महत्या केली. दीप्ती मगर चौधरी (वय ३०) असे या विवाहितेचे नाव आहे.

मृत महिलेने सासरकडील जाचास कंटाळून तसेच वारंवार माहेरकडून पैसे घेऊन येण्याच्या दबावामुळे गळफास लावून आत्महत्या केली. या प्रकरणी लोणी काळभोर पोलिसांनी पती, दीर आणि सासू-सासरे अशा चौघांवर गुन्हा दाखल केला असून सासू सुनीता चौधरी आणि पती रोहन चौधरी याला अटक करण्यात आली आहे, तर उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे.

## मच्छीमार सहकारी संस्थांचा भाजप महायुतीच्या उमेदवारांना पाठिंबा



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

नांदाई माता मच्छीमार सहकारी संस्था कोंबडभुजे आणि राधा राम मच्छीमार सहकारी संस्था खारकोपर या मच्छीमारांच्या संघटनांनी गव्हाण जिल्हा परिषद आणि गव्हाण व वहाळ पंचायत समिती निवडणुकीत भाजप महायुतीच्या उमेदवारांना आपला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे.

या संदर्भातील पाठिंबा पत्र नांदाई माता मच्छीमार सहकारी संस्थेचे अध्यक्ष सतीश रमेश कोळी तसेच राधा राम मच्छीमार सहकारी संस्थेचे अध्यक्ष नामदेव ठाकूर यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केले.

गव्हाण जिल्हा परिषद गटातून निकिता निलेश खारकर, वहाळ गणामध्ये वितेश त्रिंबक म्हात्रे, तर गव्हाण गणातून जिज्ञासा किशोर कोळी भाजप महायुतीचे उमेदवार आहेत. या उमेदवारांना नांदाई माता आणि राधा राम या मच्छीमार सहकारी संस्थांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वहाळ साईबाबा मंदिरचे प्रमुख रविशेठ पाटील, विभागीय अध्यक्ष विजय घरत, निलेश खारकर तसेच संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# वडखळ येथे भाजप युतीचा जोरदार प्रचार

## पक्ष सोडून गेलेल्यांना त्यांची जागा दाखवा -आमदार प्रशांत ठाकूर

**पेण : प्रतिनिधी**

पक्ष सोडून गेलेल्यांना जागा दाखवा, असे रोखठोक मत आमदार प्रशांत ठाकूर यांनी मांडले. वडखळ गटाचे जिल्हा परिषदेचे उमेदवार प्रभाकर उर्फ हरीओम म्हात्रे, वहखळ गणाचे उमेदवार प्रदिप म्हात्रे, वाशी गणाचे उमेदवार विवेक म्हात्रे यांच्या प्रचाराच्यावेळी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

पक्षाच्या बरोबरीने जे राहिलेत जे पक्षाच्या बरोबरीने राहुन पक्षाच्या योजना ज्यांच्या मार्फत लोकांपर्यंत नेल्या त्यांना हे आम्ही केले असे गावात असेल त्यांना सुध्दा त्यांची जागा दाखवुन देण ही कार्यकर्ता म्हणून आपले सर्वांचे कर्तव्य आहेत त्यामध्ये आपण कुठेही कमी पडता कामा नये.



घरोघरी जाऊन लोकांची दिशाभूल केली जाते, घरोघरी जाउन लोकांच्या मनामध्ये संभ्रम पोहविण्याचा प्रयत्न केला जातोयासारे त्यांनी संगितले.

भाजप उपजिल्हाध्यक्ष मिलिंद पाटील यांनी भाजप पक्षाबरोबर असताना आमदार प्रशांत ठाकूर यांचे समर्थक म्हणून त्यांची ओळख होती, मात्र भाजपला सोडून शिवसेनेत प्रवेश करून जिल्हा परिषदेची उमेदवारी करत असल्याने आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रसार माध्यमांना सांगितले की, जे पक्ष सोडून गेलेत त्यांचा पक्षाशी काडीमात्र संबंध राहिलेला नाही त्यांनी संभ्रम निर्माण करू नये, असेही बजावले आहे.

वडखळ इंद्रनगर येथील प्रचाराच्यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत जिल्हा परिषदेचे उमेदवार प्रभाकर म्हात्रे उर्फ हरीओम, वडखळ गणाचे उमेदवार प्रदिप म्हात्रे, वाशी गणाचे उमेदवार विवेक म्हात्रे यांच्यासह माजी जि.प. सभापती सुरेश म्हात्रे, वडखळचे माजी सरपंच योगेश पाटील, बडखळ सरपंच शिवानी म्हात्रे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती प्रफुल्ल म्हात्रे, सदस्य संदेश ठाकूर, डोलवी सरपंच परशुराम म्हात्रे, उंबर्डे सरपंच महेश पाटील आदींसह वडखळ ग्रामपंचायतीचे सदस्य व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## असभ्य वर्तन करणाऱ्या महिलांविरोधात कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळील रस्त्याच्या फुटपाथवर अंगप्रदर्शन करून असभ्य वर्तन करणाऱ्या सहा महिलांविरोधात पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे.



शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांनी विशेष पथक तयार केले. यात सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रज्ञा मुंडे, महिला पोलीस कॉन्स्टेबल साधना पवार, ज्योती कांडळ, शितल रवींद्र कोकणे आदींच्या पथकाने सदर ठिकाणी जाऊन अश्या प्रकारे वर्तन करणाऱ्या सहा महिलांना ताब्यात घेतले.

## नगरसेवकपदाचा विजय ज्येष्ठांच्या चरणी अर्पण -बिनेदार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माझा चौथ्यांदा नगरसेवकपदी झालेला विजय हा मी माझ्या ज्येष्ठ नागरिकांच्या चरणी अर्पण करतो. असे भावनिक उद्गार महानगरपालिकेवर सलग चौथ्यांदा भरघोस मतांनी निवडून आलेले नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांनी काढले. ते बुध्दगया प्रतिष्ठानच्यावतीने ॲड. प्रकाश बिनेदार आम्रपाली बुध्दविहार, सेक्टर ९, बिनेदार कॉर्नरजवळ, नवीन पनवेल. या ठिकाणी प्रजासत्ताक दिनी आयोजित केलेल्या त्यांच्या



जाहीर सत्कार सभारंभात बोलत होते.

या कार्यक्रमा अगोदर बिनेदार कॉर्नर आणि आम्रपाली बुध्दविहार, सेक्टर ९ येथे ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या सत्कार कार्यक्रमाप्रसंगी विनोद जोशी सर, सुनील वाघपंजे, राजेश घोडके, ॲड. शिवकुमार कांबळे, सुरेश सोनावणे, मोहन कंठे, अर्जुन ससाणे, शोभा मिटगावकर, विठाबाई सावंत, अश्वजित पवार, कैलास इंगळे आदि मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करुन शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष राष्ट्रपती पदक विजेते सुभाष कांबळे यांनी भुषविले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पत्रकार श्याम साळवी यांनी केले. या जाहीर कार्यक्रमास बिनेदार प्रेमी आणि समाज बांधव व विविध क्षैत्रातील मान्यवर आवर्जुन उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुजीत खंडीझोड, अमोल जाधव, संतोष म्हस्के, ॲड. अक्षय मिसाळ, आदिनाथ बोरुडे, प्रकाश सोनावळे, सुमित सकपाळ आदी कार्यकर्त्यांनी भरपूर मेहनत घेतली.

## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये ध्वजारोहण



**उलवे : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे येथे भारताचा ७७वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. हा कार्यक्रम लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या आशीर्वाद व मार्गदर्शनाखाली झाला.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, कामगार नेते महेंद्र घरत, संस्थेचे सदस्य ॲड. राहुल घरत, वसंत पाटील, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, शाळा समिती सदस्य जयवंत देशमुख, विश्वनाथ कोळी, साईचरण म्हात्रे, योगिता भगत, मिनाक्षी पाटील, दीपाली म्हात्रे, श्रीकांत घरत, कमलाकर देशमुख, सुधीर ठाकूर, रघुनाथ देशमुख, किशोर पाटील, वामन म्हात्रे, राजाराम जाधव आदी उपस्थित होते.

वाय. टी. देशमुख यांनी प्रेरणादायी भाषण केले. शाळेचे प्राचार्य किरणकुमार सुतार यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले.

## तक्का येथे प्रजासत्ताक दिन सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तक्का येथील श्री गुरुलिंगेश्वर मराठी प्रायमरी स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून रावसाहेब खरात साहेब (माजी उपाध्यक्ष, शा.व्य.समिती तथा भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष), सुनिल सुर्वे, राजु जिरे उपस्थित होते.

रावसाहेब खरात यांच्या हस्ते, ध्वजस्तंभ पूजन व ध्वजारोहण शाळेचे मुख्याध्यापक प्रविण शिलवंत यांचे हस्ते झाले.

मुख्याध्यापक शिलवंत, अंकिता पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यानंतर विद्यार्थ्यांचे भाषण, स्नेहसंमेलन सोहळ्याचे नृत्य सराव घेऊन विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. यानंतर सुनिल शिवकुमार पाटील यांनी मान्यवर, पालक, विद्यार्थी व सह.शिक्षक सर्वांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने सोहळा सांगता करण्यात आली. सुत्रसंचलन देवव्रत गोविंदराव चाफे यांनी केले.





**पनवेल : बानाई बचत गटाच्या वतीने गव्हाण कोपर येथे हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता. या वेळी उपस्थित महिलावर्ग.**

## रोडपाली गाव येथे प्रजासत्ताक दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका, प्रभाग क्रमांक ७, रोडपाली विभाग येथील रोडपाली गाव येथे रायगड जिल्हा परिषद शाळा, नगरसेवक, ग्रामस्थ, विद्यार्थी शिक्षक आणि स्वच्छता दूत यांच्यासोबत प्रजासत्ताक दिन साजरा करून शून्य कचरा उपक्रम राबविण्यात आला.



कार्यक्रमामार्फत विद्यार्थ्यांना व नागरिकांना शून्य कचऱ्याचे महत्त्व सांगण्यात आले आणि प्लास्टिकचे वापर करू नये असे आवाहन करण्यात आले आणि विद्यार्थ्यांना अल्पपोहाराचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाकरिता नगरसेविका मनाली ठाकूर, प्रमिला पाटील, नगरसेवक अमर पाटील, अमर ठाकूर आणि रविनाथ पाटील, ग्रामस्थ, विद्यार्थी शिक्षक वर्ग आणि स्वच्छता दूत, स्वच्छता निरीक्षक हरेश कांबळे, अमित जाधव आणि पर्यवेक्षक उपस्थित होते.

## 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे पनवेल पं.स.कडून कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील इंग्रजी माध्यम प्राथमिक त्याचबरोबर माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी संगीत शिक्षक रुपेश मढवी यांच्या मार्गदर्शनाखाली २६ जानेवारी २०२६ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त पंचायत समिती पनवेल येथे आयोजित ७७ व्या ध्वजारोहण कार्यक्रमात राष्ट्रगीत, राज्यगीत व देशभक्तीपर गीताचे गायन करत आपला उत्स्फूर्त, शिस्तबध्द व अभिमानास्पद सहभाग नोंदविला.

कार्यक्रमासाठी दुर्वा मयूर भोसले, चिन्मयी नितीन शाह, स्थायी सतीश मोकल, वैष्णवी सचिन हुकीरे, श्रुती चंद्रकांत पवार, आर्या संतोष सूर्यवंशी, संभवी नवनाथ चावरे, प्रज्ञेश गणेश गावडे, दक्ष निवृत्ती ठोंबरे, जिया एकनाथ फडके, आहाना वैभव बनसोडे ह्या विद्यार्थ्यांसमवेत संगीत शिक्षक रूपेश अशोक मढवी त्यांच्या राष्ट्रभक्तीपर सहभागाबददल गट विकास अधिकारी



समिर वाठारकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

संगीत क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीमुळे चांगू काना ठाकूर विद्यालयाच्या नावलौकिकात भर घालणाऱ्या संपूर्ण क्वायर ग्रुपचे चे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, जे. बी.एस. पी.संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्या वर्षा ठाकूर यांनी विशेष कौतुक करत शाब्बासकीची थाप दिली. त्याचबरोबर आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाइस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, तसेच इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन करून सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पनवेलमध्ये वधू-वर परिचय मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल-उरण आगरी समाज मंडळ, पनवेल आयोजित २९वा वधू-वर परिचय मेळावा मंडळाच्या महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात झाला. या वेळी माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे यांनी मार्गदर्शन केले.

कामगार नेते महेंद्र घरत यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या मेळाव्यास अध्यक्ष अतुल पाटील, उपाध्यक्ष जे.डी. तांडेल, सचिव बी.पी. म्हात्रे, कोषाध्यक्ष विजय गायकर, मेघा तांडेल, मनीषा तांडेल, शिवदास पाटील, माजी नगरसेवक जगदीश गायकर, माजी उपसरपंच संजय गायकर, डी. बी. पाटील, विद्याधर पाटील यांनी बहुमोल सहकार्य केले.

मेळाव्यामध्ये १९९ मुले व ९९ मुलींनी सहभाग घेतला. प्रत्येकी दहा मुले-मुलींना स्टेजवर बोलवून परिचय करून देण्यात येत होता.

## दुखवटा

### पांडुरंग आंबेतकर

**माणगाव :** तालुक्यातील अलिबाग, संत रोहिदास नगर चेंढरे येथील पांडुरंग धर्मा आंबेतकर (वय ५९) यांचे शनिवारी (दि.२५) निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, दोनभाऊ, एक बहीण, एक मुलगा आहे. कै. पांडुरंग आंबेतकर यांचा दशक्रिया विधी मंगळवार, ३ फेब्रुवारी व उत्तरकार्य शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी अलिबाग येथे होणार आहेत.



## निवडक

### अल्पवयीन मुलीसोबत गैरकृत्य

**नवी मुंबई :** अल्पवयीन मुलीसोबत ५५ वर्षीय सुरक्षा रक्षकाने गैरकृत्य केल्याची घटना समोर आली आहे. मुलगी राहत असलेल्या इमारतीत ही व्यक्ती सुरक्षारक्षकाचे काम करणारी आहे. १३ वर्षीय मुलगी एकटी असताना या व्यक्तीने अश्लील चाळे करून तिच्यासोबत गैरकृत्य केले. हा प्रकार मुलीने घरी गेल्यावर कुटुंबियांना सांगितला. त्यानंतर पोलिसात तक्रार करण्यात आली. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### मीनल भामरेंच्या हस्ते ध्वजारोहण

**पनवेल :** पनवेल तहसील कार्यालयाच्या पहिल्या महिला तहसीलदार मीनल भामरे-भोसले यांच्या हस्ते २६ जानेवारी निमित्त तहसील कार्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले. पहिल्या महिला तहसीलदार यांच्या हस्ते ७७ वा प्रजासत्ताक दिन पनवेलमध्ये साजरा करण्यात आला. सकाळी ७.४५ वाजता ध्वजारोहण करण्यात आले.



या कार्यक्रमाला पनवेल तालुक्यातील आजी-माजी स्वातंत्र्यसैनिक, सैनिक, नायब तहसीलदार राजश्री जोगी, मंडळ अधिकारी, तलाठी सर्व कर्मचारी तसेच पनवेल तालुक्यातील नागरिक उपस्थित होते.




**ठाणे : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वर्तक नगर, ठाणे केंद्राने मोठ्या उत्साहात प्रजासत्ताक दिन साजरा केला. या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष व विशेष कार्यकारी अधिकारी अरविंद मोरे, प्रमुख पाहुणे, आशिष सुर्वे, रमेश हौदे, रिया कुमारी, भिकू जाधव, केदार म्हात्रे, प्रवीण सकट आदी होते.**

### अन्नदाता ते ऊर्जादाता चित्ररथ

**मुंबई :** प्रजासत्ताक दिनाच्या ७७व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे आयोजित ध्वजवंदन व संचलनाच्या शासकीय कार्यक्रमात महावितरणचा चित्ररथ आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'अन्नदाता ते ऊर्जादाता' या संकल्पनेवर आधारीत महावितरणच्या या चित्ररथाचे कौतुक केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात सौर ऊर्जेला चालना देण्यासाठी व शेतकऱ्यांना शाश्वत व मोफत वीज उपलब्ध करून देण्यासाठी अन्नदाता ते ऊर्जादाता ही संकल्पना राबवली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी मागेल त्याला सौर कृषी पंप योजना व मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीतून राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज उपलब्ध करून देत या संकल्पनेच्या पुर्ततेला मोठी गती दिली आहे. या योजनांमधून राज्यातील ४५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रजासत्ताक आयोजित कार्यक्रमात चित्ररथाच्या माध्यमातून महावितरणने केवळ तंत्रज्ञान नव्हे, तर पर्यावरणाभिमुख व समृद्ध महाराष्ट्राचे चित्र मांडले आहे.

### मोठी जुई शाळेत प्रजासत्ताक दिन

**उरण :** रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा मोठी जुई शाळेत ७७वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात आणि संगीतमय वातावरणात साजरा करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापकांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. देशभक्तीपर गीतांच्या तालावर विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध आणि लयबद्ध कवायतींचे सादरीकरण केले. तसेच एसएमएस डेकोरेटरने तयार केलेल्या सुंदर डेकोरेशनने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक व विद्यार्थी यांनी मेहनत घेतली.



पान १ वरुन

### पनवेलमध्ये शेकापला हादरा!

या पक्षप्रवेश कार्यक्रमाला भाजपचे जिल्हा सरचिटणीस व पनवेल महापालिकेतील भाजप महायुतीचे गटनेते नितीन पाटील, माजी शहर अध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, नगरसेवक एकनाथ गायकवाड, अजय बहिरा, महाराष्ट्र प्रदेश वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभूदास भोईर, माजी नगरसेवक सुनील बहिरा, प्रभाकर बहिरा, विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, जयवंत भगत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, अतुल घरत, माजी सरपंच अतुल तांबे, मच्छिंद्र पाटील, संजय भगत, नितीन भगत, हेमंत भगत, मुकेश भगत यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### खानाव येथे लाडक्या बहिणींचा मेळावा

या मेळाव्याला परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमात महिलांना शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली तसेच महिलांसाठी विविध खेळ, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचेदेखील आयोजन करण्यात आले होते, ज्यामुळे महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण पहायला मिळाले.



# केवाळे येथील पक्षप्रवेशामुळे भाजपची शक्ती आणखी वाढली

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्रातील मोदी सरकार सबका साथ, सबका विकास हे सूत्र राबवून प्रत्येक घराघरापर्यंत कल्याणकारी योजनांचा लाभ पोहोचवत आहे. यामुळेच सर्वसामान्यांमध्ये भारतीय जनता पार्टीविषयी मोठी आस्था निर्माण झाली असून, जेव्हा तुमच्यासारखे सहकारी भाजपसोबत जुडले जातात, तेव्हा आम्हाला मोठी ताकद मिळते. तुमच्या या पक्षप्रवेशामुळे भाजपची शक्ती आणखी वाढली आहे, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी केवाळे येथे व्यक्त केला.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत केवाळे येथील अनेक पदाधिकाऱ्यांनी भाजपच्या विकासाच्या प्रवाहात सामील होण्याचा निर्णय घेतला असून, या सर्व कार्यकर्त्यांचे आमदार ठाकूर यांनी पक्षात स्वागत केले. येत्या ५ तारखेला भारतीय जनता पक्ष निवडणुकीला सामोरी जात असून नेरे जिल्हा परिषद गटासाठी आत्माराम भस्मा आणि आदई पंचायत समिती गणासाठी भूपेंद्र पाटील हे निवडणूक लढवणार आहेत. आपली निशाणी कमळ असून, या दोन्ही उमेदवारांना विजयी करण्यासाठी आपल्याला संपूर्ण ताकद लावायची आहे, असे आवाहनही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी कार्यकर्त्यांना केले.





या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केवाळे येथील योगेश माळी, राजाराम माळी, गोटीराम गायकर, शंकर डांगरकर, दत्तात्रेय माळी, बळीराम गायकर, दिनेश माळी, आत्माराम माळी आणि किसन गायकर यांच्या प्रयतकतून माजी सरपंच शाळीक नारायण माळी, अण्णा माळी, ग्रामपंचायत सदस्य हिरामन भगत, राजेश माळी, भरत भोईर, भारती भोईर, जना निरगुडा, अशोक माळी, सुनील माळी आणि विघ्नेश पालकर यांच्यासह अनेक समर्थकांनी भारतीय जनता पक्षाचे कमळ हाती घेतले.

या पक्षप्रवेश सोहळ्याप्रसंगी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, जिल्हा सरचिटणीस यतीन पाटील, सरपंच सचिन पाटील, नगरसेवक संतोष शेट्टी, रवींद्र जोशी, रमेश पाटील यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पक्षप्रवेशामुळे परिसरात भाजपचे पारडे जड झाले असून निवडणुकीच्या प्रचाराला आता मोठी गती मिळणार आहे.

# शिवसेनेच्या सोनल घरत यांचा अर्ज मागे

## भाजप महायुतीच्या उमेदवार जिज्ञासा कोळी यांच्या विजयाचा मार्ग मोकळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या गव्हाण गणातून शिवसेनेच्या उमेदवार सोनल मनोज घरत यांनी महायुतीचा धर्म पाळत आपला उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आता भाजप महायुतीच्या उमेदवार जिज्ञासा किशोर कोळी यांच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्यातील महायुती सरकारची एकजूट, शिस्त आणि समन्वय कायम ठेवण्याच्या दृष्टीने राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे, खासदार श्रीरंग बारणे तसेच आमदार महेंद्र थोरवे यांच्या सूचनेनुसार सोनल घरत यांनी हा निर्णय घेतला.

महायुती अधिक बळकट करण्यासाठी आणि स्थानिक पातळीवर विकासाला प्राधान्य देण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. या निर्णयाची अधिकृत घोषणा करण्यासाठी सोनल घरत यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांची सदिच्छा भेट घेतली.

या वेळी मनोज घरत, भाजपचे विभागीय अध्यक्ष विजय घरत, उलवे शिवसेनाप्रमुख संदीप वायंगणकर, उपशाखाप्रमुख उदय रेणके, उपशहरप्रमुख अंकुश राठोड यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी महायुतीच्या उमेदवाराच्या पाठीशी ठामपणे उभे राहून विजयासाठी पूर्ण ताकद लावण्याचा निर्धार व्यक्त केला.

महायुतीच्या माध्यमातून पनवेल तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी एकसंघपणे काम करण्यात येईल, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला.

# सीकेटी विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगु काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा झाला. संस्थेचे उपकार्याध्यक्ष वाय टी देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

कार्यक्रमासाठी संदीप पाटील, जगदीश घरत, हरचंदसिंग सग्गू, राजेंद्र सोनवणे, किसन गायकर, तुषार पाचालकर त्याचबरोबर, मुख्याध्यापक कैलास सत्रे, प्राचार्य प्रशांत मोरे, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मुख्याध्यापक सुभाष मानकर, मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षिका निरजा अधूरी, वैशाली पारधी, स्वाती पाटील, पर्यवेक्षक अजित सोनवणे, कैलास म्हात्रे तसेच शिक्षक, विद्यार्थी, पालक ,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. संस्थेचे उपकार्याध्यक्ष वाय टी देशमुख यांनी अध्यक्षपर भाषणातून आपले विचार व्यक्त करून प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर शाळेच्या मैदानावर इंग्रजी प्राथमिक व मराठी माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांच्या तालावर कवायत प्रकारांचे तर इंग्रजी माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी लेझीम प्रकाराचे सुंदर सादरीकरण केले.

इंग्रजी माध्यमिक विभागातील तनिष्का गावडे व आयुष चित्ते यांनी मनोगते व्यक्त केली. सूत्रसंचालन वाणिज्य विभागातील सहशिक्षिका योगिता जोरी यांनी केले.



**कळंबोली : भाजप कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.**



**पनवेल : याकुब बेग हायस्कूल व ज्युनियर कॉलेज संकुलात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इक्बाल हुसैन काझी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.**



**खारघर : सेक्टर १९ येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी गुरू ठाकूर, फुलाजी ठाकूर, शुभ पाटील आदी उपस्थित होते.**





**पनवेल : भाजपचे ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप नेते रविशेठ पाटील, विभागीय अध्यक्ष विजय घरत, हेमंत ठाकूर, किरण देशमुख, विश्वनाथ कोळी, गव्हाण पंचायत समितीच्या उमेदवार जिज्ञासा कोळी, निलेश खारकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**



**गव्हाण : आई गावदेवी रिक्षा चालक मालक संस्था गव्हाणच्या वतीने राम मंदिर गव्हाण (कोळीवाडा) येथे श्री सत्यनारायण महापूजा आयोजित करण्यात आली होती. या पुजेच्या दर्शनासाठी माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायत माजी सदस्य योगिता भगत यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.**





**पनवेल : गव्हाण जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत महायुती उमेदवारांच्या प्रचारार्थ बूथ क्रमांक ७३, ७७, ७८ येथे उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्ते.**

# सिद्धार्थ मार्केट सोसायटीच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'जुने जावो, नवीन येवो, प्रगतीचे पाऊल पुढे पडो' या ब्रीदवाक्याला सार्थ ठरवत, श्री समर्थ कृपा बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांच्या वतीने सिद्धार्थ मार्केट को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या नवीन इमारतीचा भव्य भूमिपूजन सोहळा मंगळवारी अत्यंत उत्साहात झाला.

या सोहळ्यामुळे सोसायटीच्या सभासदांचे हक्काच्या आणि आधुनिक सोयीसुविधांनी युक्त अशा नवीन वास्तूमध्ये जाण्याचे स्वप्न आता लवकरच प्रत्यक्षात येणार आहे. या इमारतीच्या कामाचे भूमिपूजन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी सभासदांना आणि विकासकांना शुभेच्छा देताना या प्रकल्पामुळे नागरिकांचे जीवनमान उंचावेल,



असा विश्वास व्यक्त केला.

या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस तथा पनवेल महापालिकेचे गट नेते नितीन



पाटील, नगरसेवक सुमित झुंझारराव, नगरसेविका रुचिता लोंढे, करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, कर्ना शेलार, चेअरमन रवींद्र गायकवाड, व्हाईस चेअरमन नामदेव पाटील, सेक्रेटरी संजय गवळी, सहसेक्रेटरी अभिनय जोगी, खजिनदार प्रदीप पाटील आणि सहखजिनदार विनू म्हात्रे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या इमारतीमुळे परिसराच्या वैभवात मोठी भर पडणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला केला.

# रामशेठ ठाकूर विद्यालय आणि महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय आणि रामशेठ ठाकूर महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तसेच त्यांनी त्यांच्या हस्ते ध्वजारोहण केले. या वेळी त्यांनी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी दीपक शिंदे, प्रभाकर जोशी, सुजाता जोशी, सचिन वासकर, जयदास तेलावणे व सचिन खोपडे हे उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे तसेच रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या निशा नायर याही या वेळी उपस्थित होत्या.

रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खुशबू भोसले यांनी केले.



## संपादकीय

# ऐतिहासिक व अद्‌भूत

भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील ऐतिहासिक मुक्त व्यापार कराराची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी केली. जगातील दोन प्रमुख अर्थव्यवस्थांमधील समन्वयाचे हे एक अद्‌भूत उदाहरण ठरले असून हा करार म्हणजे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना मोठा झटका मानला जातो आहे.

**भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील मुक्त व्यापार कराराला 'सर्व करारांची जननी' असे संबोधले जात असून या करारामुळे जागतिक व्यवसाय आणि गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास नक्कीच आणखी दृढ होणार आहे. हा केवळ एक व्यापार करार नसून हा 'सामायिक मूल्यांचा विजय' आहे असे उद्‌गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कराराबाबत काढले आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ लादला आहे. त्यामुळे भारताला अमेरिकेत वस्तू निर्यात करण्यासाठी ५० टक्के कर द्यावा लागतो. याचा फटका अर्थातच भारताला बसतो आहे. तशाच प्रकारची झळ ट्रम्प यांच्यामुळे युरोपियन देशांनाही सोसावी लागते आहे. या पार्श्वभूमीवर भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात मुक्त व्यापार कराराची घोषणा मंगळवारी करण्यात आली आहे. भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील हा करार गेल्या अनेक वर्षापासून रखडला होता. २०१३मध्ये सुरू झालेल्या चर्चेत मध्यंतरी खंड पडला. पण जून २०२२नंतर चर्चा पुन्हा सुरू झाली व अनेक मतभेदांच्या अडथळ्यांनंतर ती आता निर्णायक टप्प्यावर पोहोचली आहे. या करारानंतर युरोपियन युनियनच्या अध्यक्षा उर्सुला व्हॉन डेर लेयेन यांनी त्याचा उल्लेख 'मदर ऑफ ऑल डील्स' असा केला व आज युरोप आणि भारत इतिहास घडवत आहेत असेही त्यांनी म्हटले. ही तर केवळ सुरुवात आहे असे म्हणत त्यांनी भारताचे कौतुक केले. या करारावर अधिकृत स्वाक्षरी होण्यास सुमारे सहा महिने लागतील. त्यानंतर पुढील वर्षी म्हणजेच २०२७पासून हा करार लागू होईल. यापूर्वी २०२३-२४मध्ये युरोपियन युनियन भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार ठरला होता. दोन्ही बाजूंमध्ये १३५ अब्ज डॉलरचा व्यापार झाला होता. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणामुळे सध्या दोन्ही बाजूंना अस्थिरतेला तोंड द्यावे लागते आहे. त्यामुळेच दोन्ही बाजूंनी वादाचे मुद्दे तूर्तास बाजूला ठेवून करार पूर्णत्वास नेण्याला प्राधान्य दिले आहे. स्वाभाविकच हा करार म्हणजे ट्रम्प यांना मोठा झटका मानला जातो आहे. अर्थातच, ट्रम्प हे सारे निमूटपणे पाहत गप्प बसतील अशी अपेक्षा कुणीही करणार नाही. युरोप आणि भारताची मिळून लोकसंख्या दोन अब्ज म्हणजे जगाच्या एकचतुर्थांश इतकी आहे. दोघांचा जगातील जीडीपीमधील हिस्साही एकचतुर्थांश एवढा आहे. या करारामुळे भारत आणि युरोपीय देशांमधील लाखो लोकांना मोठ्या संधी उपलब्ध होतील. भारताला यामुळे २७ युरोपीय देशांच्या बाजारपेठेत थेट प्रवेश मिळणार असून जागतिक पुरवठा साखळीतील भारताची भूमिका आणखी बळकट होणार आहे. या व्यापार करारामुळे देशातील गुंतवणूकदारांना काहीसा दिलासा मिळाल्याचे मंगळवारी दिसून आले. देशातील दोन्ही शेअरबाजार निर्देशांक दिवसाच्या नीचांकी पातळीवरून सावरत सकारात्मक पातळीवर बंद झाले. भारत-युरोपियन युनियन व्यापार करारामुळे भारतातील उत्पादन वाढेल. देशातील सेवा आणि संबंधित क्षेत्रांचा मोठ्या प्रमाणात विस्तार होण्यास मदत होईल हे निश्चित.**

# 'पंजाब केसरी' स्वातंत्र्यवीर लाला लजपत राय



लाला लजपत राय यांचा जन्म २८ जानेवारी १८६५ रोजी झाला. ते भारताचे प्रमुख स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांना 'पंजाब केसरी' असेही म्हणतात. त्यांनी पंजाब नॅशनल बँक आणि लक्ष्मी इन्शुरन्स कंपनीची स्थापना केली. ते लाल-बाल-पाल या तीन प्रमुख नेत्यांपैकी एक होते.

लालाजींचा जन्म पंजाबमधील फिरोजपूर जिल्ह्यातील धुडीके नावाच्या गावात झाला होता आणि त्यांचे पालन-पोषण अतिशय उदार वातावरणात झाले होते. लाहोरच्या सरकारी महाविद्यालयात कायद्याचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी प्रवेश घेतला, जिथे ते स्वामी दयानंद आणि बाळ गंगाधर टिळक यांच्या संपर्कात आले. कायद्याची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी १८८६मध्ये हिस्सार येथे कायद्याचा सराव सुरू केला. कायद्याचा सराव करण्याबरोबरच ते लवकरच सक्रिय कार्यकर्ता बनले.

अमेरिका आणि इंग्लंडमधील वास्तव्यादरम्यान त्यांनी कामगार चळवळ जवळून पाहिली. या चळवळीने त्यांना खूप प्रेरणा दिली. स्वातंत्र्य चळवळीच्या वाढत्या समर्थनाविरुद्ध ब्रिटिश सरकारच्या हुकूमशाही मार्गाने लालाजींना लोकांमध्ये राष्ट्रीय अभिमान आणि स्वाभिमान जागृत करण्यास प्रवृत्त केले आणि लवकरच प्रचंड लोकप्रियतेसह, लालाजी या नवीन राष्ट्रवादी लॉबीचे मान्यताप्राप्त नेते म्हणून उदयास आले. ते हिंदू धर्म आणि शांतता आणि मानवतेच्या हिंदू विचारसरणीवर विश्वास ठेवणारे होते. राष्ट्रवादी विचारांनाही हिंदू धर्मासोबत जोडल्यास धर्मनिरपेक्ष राष्ट्र निर्माण होऊ शकते, असा त्यांचा विश्वास होता.

बाळ गंगाधर टिळक आणि बिपिनचंद्र पाल यांच्यासोबतची ही त्रिमूर्ती लाल-बाल-पाल म्हणून ओळखली जात होती. या तीन नेत्यांनी प्रथम भारतात संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली, नंतर संपूर्ण देश त्यांच्यात सामील झाला. स्वामी दयानंद सरस्वती यांच्यासोबत त्यांनी आर्य समाजाला पंजाबमध्ये लोकप्रिय केले. लाला हंसराज आणि कल्याण चंद्र दीक्षित यांच्यासोबत, दयानंद यांनी अँग्लो-वेदिक शाळांचा प्रसार केला, ज्यांना आता डीएव्ही शाळा आणि महाविद्यालये म्हणून ओळखले जाते. लालाजींनी दुष्काळातही अनेक ठिकाणी छावण्या उभारून लोकांची सेवा केली होती.

३० ऑक्टोबर १९२८ रोजी लाहोरमध्ये सायमन कमिशनच्या विरोधात आयोजित केलेल्या मोठ्या निदर्शनात त्यांनी भाग घेतला, त्या दरम्यान लाठीचार्जमध्ये ते गंभीर जखमी झाले. त्यावेळी ते म्हणाले होते, 'माझ्या अंगावर पडलेली प्रत्येक काठी ब्रिटिश सरकारच्या शवपेटीतील खिळ्याचे काम करेल.' आणि तेच झालं; लालाजींच्या बलिदानानंतर २० वर्षातच ब्रिटीश साम्राज्याचा सूर्य मावळला. लाठीचार्जमध्ये झालेल्या या जखमांमुळे १७ नोव्हेंबर १९२८ रोजी त्यांचे निधन झाले.

लालाजींच्या मृत्यूने संपूर्ण राष्ट्र संतप्त झाले आणि चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव आणि इतर क्रांतिकारकांनी लालाजींवर केलेल्या खुनी लाठीचार्जचा बदला घेण्याचे ठरविले. आपले व्रत पूर्ण केल्यानंतर १७ डिसेंबर १९२८ रोजी ब्रिटीश पोलीस अधिकारी साँडर्स यांना गोळ्या घालून ठार मारण्यात आले. राजगुरू, सुखदेव आणि भगतसिंग यांना केवळ लालाजींच्या मृत्यूच्या बदल्यात साँडर्सच्या हत्येप्रकरणी फाशीची शिक्षा झाली.

लाला लजपत राय हे भारतातील दर्जेदार शिक्षणाचे मोठे समर्थक होते. म्हणूनच भारतातील दर्जेदार शिक्षणासाठी लाला लजपत राय ट्रस्ट नावाचा ट्रस्ट स्थापन करण्यात आला आहे. लाला लजपतराय राष्ट्रवादी युवकांमध्ये खूप लोकप्रिय होते कारण त्यांच्याकडे अपवादात्मक नेतृत्व गुण होते. ते एक उत्तम वक्ता तर होतेच पण एक उल्लेखनीय लेखकही होते. त्यांनी आर्य गॅझेटमध्ये आर्य समाजाशी संबंधित अनेक नियतकालिके लिहिली. त्यांच्या निबंधांनी तरुणांमध्ये स्वातंत्र्याचा आवेश आणि उत्साह रोवला.

लाला लजपत राय जयंती नेहमीच भारतातील तरुणांच्या सहवासात पाहिली जाते कारण त्यांनी त्यांच्यामध्ये देशभक्तीची तीव्र भावना जागृत केली. देशभरात अनेक राष्ट्रीय आणि देशभक्तीपर कार्यक्रम आयोजित केले जातात. शाळा-महाविद्यालयांमध्ये देशभक्तीवर विविध भाषणे, व्याख्याने आयोजित केली जातात. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचे योगदान सांगणारी नाटके आणि नाटकांमध्ये मुले भाग घेतात.

भूतकाळाकडे पाहणे व्यर्थ आहे, जोपर्यंत त्या भूतकाळावर अभिमानास्पद भविष्य घडवण्याचे काम केले जात नाही. नेता तो असतो ज्याचे नेतृत्व प्रभावी असते, जो नेहमी आपल्या अनुयायांपेक्षा पुढे असतो, जो धैर्यवान आणि निर्भय असतो. अहिंसा म्हणजे पूर्ण निष्ठा आणि प्रामाणिकपणाने शांततापूर्ण मार्गाने उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न. पराभव आणि अपयश हे कधी कधी विजयासाठी आवश्यक पावले असतात. (साभार : इंटरनेट)

# स्वतंत्र भारताचे पहिले लष्करप्रमुख के.एम. करिअप्पा



फील्ड मार्शल के. एम. करिअप्पा यांचा आज जयंती दिवस. कर्नाटकातील मरकारा (कूर्ग) येथे जन्म व प्रारंभीचे शिक्षणही तिथेच झाले. नंतर प्रेसिडेन्सी कॉलेज मद्रास येथे व पुढे इंदूरच्या डॅली कॉलेजमधून त्यांनी लष्करात सहभाग घेतला.

इराक (१९२०-२१), वायव्य सरहद्द प्रांत (१९२२-२५, १९२८-३० व १९४६) येथील लष्करी कारवायांत के. एम. करिअप्पा यांनी भाग घेतला. क्वेटा येथील स्टाफ कॉलेजमध्ये प्रवेश मिळविणारे ते पहिले भारतीय अधिकारी होते. दुसऱ्या महायुद्धात इराक, सिरिया आणि इराण (१९४१-४२) तसेच ब्रह्मदेशातील आराकान (१९४३-४४) येथील लष्करी मोहिमांत ते सहभागी होते. १९४७ साली लंडनच्या इंपीरियल डिफेन्स कॉलेजमध्ये त्यांनी प्रशिक्षण घेतले. स्वंतत्र भारतात सेनाप्रमुख म्हणून १९४९-५३ या काळात त्यांनी महत्त्वाचे कार्य केले.

के. एम. करिअप्पा यांनी १५ जानेवारी १९४९ साली तत्कालीन ब्रिटिश जनरल सर रॉय बुचर यांच्याकडून लष्काराचे पहिले भारतीय कमांडर-इन-चीफ म्हणून सूत्रे स्वीकारली होती. तेव्हापासून १५ जानेवारी हा लष्कर दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

के.एम. करिअप्पा हे १९४७मध्ये युनाइटेड किंगडमच्या इंपिरियल डिफेंस कॉलेजमध्ये प्रशिक्षण घेण्यासाठी जाणारे पहिले भारतीय ठरले. १९५३मध्ये लष्करातून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या देशांमध्ये भारताचे उच्चायुक्त म्हणून काम केले. १९५६पर्यंत त्यांनी उच्चायुक्त म्हणून पदावर सांभाळला होता.

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रूमन यांनी लीजन ऑफ मेरिट, डिग्री ऑफ चीफ कमांडर इ. पुरस्कार त्यांना दिले. नेपाळच्या राजाने आपल्या लष्करात मानसेवी जनरलचा हुद्दाही त्यांना दिला होता (१९५२). सेवानिवृत्तीनंतर त्यांनी ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड येथील भारताचे उच्चायुक्त म्हणून काम केले (१९५३-५६). अनेक क्रीडासंस्था आणि निवृत्त सैनिकांच्या संस्था यांच्याशी त्यांचे निकटचे संबंध होते.

याचबरोबर १९८३मध्ये के.एम. करिअप्पा यांना भारतीय लष्करातील फील्ड मार्शल हा सन्मान देऊन गौरविण्यात आले होते. त्यांच्याशिवाय सॅम माणेकशॉ यांनादेखील हा सन्मान देण्यात आला होता. १९९३ साली के.एम करिअप्पा यांचे बंगळुरूमध्ये निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## बदलते तंत्रज्ञान

# बॅटरी लाईफ वाढवण्याचं 'हे' आहे सीक्रेट

आजच्या काळात फोन केवळ एक गॅझेट राहिलेला नसून ती आपल्या दैनंदिन जीवनातील एक मूलभूत गरज बनली आहे. कॉल्स, इंटरनेट, यूपीआय पेमेंट्स, काम आणि मनोरंजन अशा सर्व गोष्टी बॅटरीवर अवलंबून असतात. अशा परिस्थितीत तुमच्या फोनच्या बॅटरीची लाईफ थेट तुमच्या वापराशी संबंधित असते. तरीही अनेक लोक चार्जिंगकडे दुर्लक्ष करतात आणि त्याच जुन्या चुका वारंवार करतात, ज्यामुळे हळूहळू बॅटरी कमकुवत होत जाते.




वस्तुस्थिती अशी आहे की, लिथियम बॅटरीची एक ठराविक 'चार्जिंग रेंज' असते. जर तुम्हाला तुमचा फोन जास्त गरम होऊ नये, बॅटरी लवकर कमी नये आणि फोन दीर्घकाळ स्मूथ चालावा असे वाटत असेल, तर फोन चार्जिंगवरून कधी काढावा आणि किती टक्क्यांपर्यंत चार्ज करणे योग्य आहे हे समजून घेणं अत्यंत आवश्यक आहे.

आजकालच्या बहुतांश स्मार्टफोनमध्ये 'लिथियम आयन' बॅटरी असते. या बॅटऱ्या अत्यंत प्रगत असतात आणि ओव्हरचार्जिंगपासून स्वतःचा बचाव करू शकतात. म्हणूनच अनेकांना वाटतं की १००% चार्जिंग केल्याने काही फरक पडत नाही. पण वास्तव हे आहे की, याचा परिणाम हळूहळू जाणवतो. जेव्हा फोन ८०%च्या पुढे १००% कडे जातो, तेव्हा बॅटरीवर जास्त ताण पडतो आणि त्यातील केमिकल प्रोसेस वेगवान होते.

जर हे रोज घडत राहिले, तर काही महिने किंवा वर्षांत बॅटरीची क्षमता कमी होऊ लागते. कधीतरी १००% चार्ज केल्याने नुकसान होणार नाही, पण ती सवय लावणं चुकीचं आहे. सध्या आयफोन आणि अँड्रॉइडमध्ये 'ऑप्टिमाइझ्ड' किंवा 'अॅडॉप्टिव्ह चार्जिंग'सारखी फीचर्स असतात, जी चार्जिंगचा वेग नियंत्रित करून बॅटरी सुरक्षित ठेवतात. मात्र, रोज रात्रभर फोन १००% चार्जिंगला लावून ठेवल्यास बॅटरी लवकर खराब होऊ शकते.

बॅटरी तज्ज्ञ आणि टेक कंपन्यांच्या टेस्टिंगनुसार फोनची बॅटरी २०% ते ८०%च्या दरम्यान ठेवणे सर्वात योग्य मानलं जातं. या रेंजमध्ये बॅटरी पूर्णपणे रिकामीही नसते आणि पूर्ण भरलेलीही नसते. यामुळे बॅटरीवरचा ताण कमी होतो आणि 'चार्ज सायकल' जास्त काळ चांगली राहते. सोप्या भाषेत सांगायचं तर ८०% चार्जिंग झाल्यावर फोन काढणं हे बॅटरीसाठी फायदेशीर आहे.

# संगीत मार्तंड पं. जसराज



### निमित्त

स्वरांच्या साडेतीन सप्तकांमध्ये फिरणारे, सुमधुर आवाजाची देणगी लाभलेले, जसरंगी जुगलबंदी या अनोख्या गायन प्रकाराचं भारतीय संगीतसृष्टीला योगदान देणारे आणि आपल्या गायनाद्वारे रसिकांना ईश्वरानुभूती देणारे तपस्वी गायक तसंच देश-विदेशातल्या अनेक विद्यार्थ्यांना गुरूकुल पद्धतीने शिक्षण देऊन संगीतसंपन्न वारसा पुढील पिढीपर्यंत पोहचवणारे गानगुरू म्हणजे पंडित जसराज. त्यांचा जन्म २८ जानेवारी १९३० रोजी झाला.

पं. जसराज हे ८० वर्षांहून अधिक काळ संगीत क्षेत्रात कार्यरत होते. त्यांचे वडील मोतीराम हेसुद्धा मेवाती घराण्याचे गायक होते. त्यांना वयाच्या चौथ्या वर्षी वडील पं. मोतीराम यांच्याकडून तालीम मिळाली. जसराज यांच्या बालपणाचे काही दिवस हैदराबादच्या गल्ली-मोहल्यात गेले. बेगम अख्तर यांच्या गजला, 'दिवाना बना है तो दिवाना बना दे, वरना तकदीर कही तमाशा न बना दे' ऐकत असत. या गजलनेच त्यांना शाळा सोडायला लावली आणि मग ते स्वत: तबला वाजवू लागले. तबलजी हे गायकाच्या तुलनेत इतर साथीदारांना दुय्यम समजले जाते हे कळल्यामुळे ते अतिशय व्यथित झाले आणि मग त्यांनी तबला वाजवायचे सोडून गायक बनायचे ठरवले.

अनेक वर्षांनी जसराज यांना लाहोरमध्ये गायक कलाकाराच्या रूपात मंचावर मुख्य आकर्षण म्हणून यावे हे सुचले आणि मग गायक होण्यासाठीचा दीर्घ संघर्ष सुरू झाला. एका मैफलीमध्ये त्यांचे गायन ऐकून 'तुम तो सुन्नी शागीर्द हो' अशा शब्दांत तबलानवाज उस्ताद आमीर हुसेन खाँ यांनी गौरव केला होता. उस्ताद अमीर खाँ साहेब, गुलाम अली खाँ आणि ओंकारनाथ ठाकूर यांचे गाणे त्यांना खूप आवडायचे.

हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताला आराध्य मानणारे पं. जसराज हे चित्रपटसृष्टीत फारसे रमले नाहीत. २००८मध्ये त्यांनी एका चित्रपटासाठी गाणे गायले. त्यानंतर विक्रम भट दिग्दर्शित '१९२०' या चित्रपटासाठी 'वादा तुमसे है वादा' हे गाणे गायले.

पं. जसराज यांची कन्या दुर्गा जसराज यांच्या संकल्पनेतून पंडितजीचा जीवनपट उलगडणारी 'गोल्डन व्हॉइस गोल्डन इयर्स' ही चित्रफीत साकारली आहे. पंडितजींचे काम एवढे मोठे आहे की आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र संघाने (आयएयू) ११ नोव्हेंबर २००६ रोजी सापडलेल्या एका ग्रहाला त्यांच्या सन्मानार्थ पंडितजराज असे नाव दिले. असा मान मिळवणारे ते पहिले भारतीय कलाकार होते. पं. जसराज यांचा आवाज २०१२मध्ये दक्षिण ध्रुवावर अंटार्क्टिका येथेही दुमदुमला होता. सात महाद्वीपांवर गाणारे ते पहिलेच हिंदुस्थानी गायक होते! साणंद येथील महाराज महाराणा जयवंतसिंगजी यांना ते आध्यात्मिक गुरू मानायचे. जसराज हे चित्रपती व्ही. शांताराम यांचे जावई. पत्नी मधुरा या व्ही. शांताराम यांच्या कन्या होत.

भारत सरकारने संगीत क्षेत्रातील कामगिरीबद्दल पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण असे पुरस्कार देऊन जसराज यांना गौरवले. तर इतर देशांमध्येही त्यांचे चाहते होते. पं. संजीव अभ्यंकर, कला रामनाथ आदी शिष्य त्यांनी घडवले. त्याचप्रमाणे अमेरिका व कॅनडात शिष्य आहेत. पं. जसराज कुटुंबासह अमेरिकेत राहत होते. १७ ऑगस्ट २०२० रोजी त्यांचे निधन झाले. **-संजीव वेलणकर**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# मुलांना थायरॉईड होण्याची लक्षणं आणि कारणं..

जास्तीत जास्त केसेसमध्ये महिलांनाच थायरॉईडची समस्या अधिक बघायला मिळते, पण आजकाल थायरॉईडची समस्या फक्त महिलांपुरती मर्यादित राहिलेली नाही. पुरुषांबरोबरच लहान मुलांमध्येही थायरॉईडचे रुग्ण वाढताना दिसत आहेत. पूर्वी थायरॉईड हा आजार प्रामुख्याने मोठ्यांचा म्हणजेच जास्त वय असलेल्यांचा मानला जात होता, मात्र आता मुलांमध्येही हायपोथायरॉईडिझम म्हणजे थायरॉईड कमी तयार होणे आणि हायपरथायरॉईडिझम म्हणजे थायरॉईड जास्त तयार होणे या दोन्ही स्थिती आढळतात. अशात डॉ. श्रेय श्रीवास्तव यांनी एका वेबसाईटला माहिती दिली की, मुलांमध्ये थायरॉईड असल्यास कोणती लक्षणे दिसतात आणि पालकांनी काय काळजी घ्यावी.



### मुलांमध्ये थायरॉईडची लक्षणं

मुलांमध्ये थायरॉईड ओळखणं थोडं अवघड असू शकतं, कारण याची लक्षणे अनेकदा सामान्य समस्यांसारखी वाटतात.

### वजन अचानक वाढणं किंवा कमी होणं

मुलाचं वजन अचानक खूप वाढणं किंवा झपाट्याने कमी होणं हे थायरॉईडचं महत्त्वाचं लक्षण असू शकतं. त्यामुळे मुलांच्या वजनाकडे नियमितपणे लक्ष द्यावे.

### सतत सुस्तपणा किंवा चिडचिड

मुलं कायम थकलेली, आळशी किंवा कारण नसताना चिडचिडी वाटत असतील, तर हे खासकरून हायपोथायरॉईडिझमचं लक्षण असू शकतं. थायरॉईडच्या असंतुलनामुळे शारीरिक वाढ मंदावते आणि वर्तनात बदल दिसू शकतात.

### केस गळणं आणि कोरडी त्वचा

मुलांचे केस जास्त प्रमाणात गळणं, त्वचा खूप कोरडी होणं हेही थायरॉईडची चिन्हे असू शकतात. लहान मुलांमध्ये उंची न वाढणं किंवा बोलायला उशीर होणं हे देखील इशारे मानले जातात.

### लक्षणे दिसल्यास काय करावे?

ही लक्षणे दीर्घकाळ दिसत राहिल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. साध्या ब्लड टेस्टच्या माध्यमातून थायरॉईडची तपासणी करता येते. वेळेवर निदान आणि उपचार केल्यास मुलांचा शारीरिक व मानसिक विकास योग्य प्रकारे होऊ शकतो. त्यामुळे पालकांनी मुलांच्या आरोग्यात आणि वागण्यात होणाऱ्या बदलांकडे लक्ष देणं अत्यंत गरजेचं आहे.

# युतीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करा -खासदार धैर्यशील पाटील

**नागोठणे : बातमीदार**

भाजप हा पक्ष गरिबांच्या हितासाठी धोरण राबविणारा पक्ष असून भाजप कार्यकर्ता वरिष्ठ नेत्यांचा आदेश मारणारा कार्यकर्ता आहे असे सांगून येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीत रायगड जिल्ह्यात भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसची युतीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील यांनी नागोठण्यात केले.



नागोठणे येथील भाजप रायगड जिल्हा उपाध्यक्षा श्रेया कुंटे यांच्या निवासस्थानी सोमवार २६ जानेवारी रोजी खासदार धैर्यशील पाटील यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक संधर्भात पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते त्यावेळी खासदार पाटील यांनी युतीची घोषणा करून ज्या ज्या उमेदवारांनी वरिष्ठ नेत्यांच्या सुचनेचा आदर करून पक्ष हितासाठी निवडणुकीतुन माघार घेतली त्या सर्वांचे खासदार पाटील यांनी कौतुक करून युतीचा धर्म पाळा व जोमाने कामाला लागून युतीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करा, असा आदेश दिला.

या वेळी जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर, श्रेया कुंटे, नागोठणे मंडळ अध्यक्ष महेश ठाकूर, ज्येष्ठ नेते मारुती देवरे, महादेव मोहिते, अनंत वाघ, गणपत म्हात्रे, रोहा ता. महामंत्री एकनाथ ठाकूर, आनंद लाड, युवा मोर्चा ता. अध्यक्ष निखिल मढवी, सिराज पानसरे, संतोष लाड, रउफ कडवेकर, शेखर गोळे, नामदेव वाघमारे, ज्ञानेश्वर शिर्के, अशोक अहिरे, राजेंद्र लवटे, मोरेश्वर म्हात्रे, विठोबा माळी, ॲड. गणेश जाधव, राजन दुबे, सागर शिर्के, कल्पेश माने, गणेश घाग, तिरत पोलसानी, धनराज उमाळे, प्रमोद नागोठणेकर, संतोष डाकी, रंजना माळी, आदी प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजप प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण, खासदार धैर्यशिल पाटील, आमदार प्रशांत पाटील, आमदार रविशेठ पाटील व जिल्हा महामंत्री सतिश धारप या नेत्यांनी मला उमेदवारी मागे घेण्याची सूचना केली तसेच माझी पक्षावर असलेली निष्ठा व पक्षाचा आदेश व शिस्त याचा आदर करून मी नागोठणे जिल्हा परिषद निवडणुकीतुन माघार घेतली असल्याचे जिल्हा उपाध्यक्ष सोपानभाऊ जांबेकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

**निवडणुकीतुन माघार घेतलेले भाजपचे उमेदवार**

सोपान जांबेकर (नागोठणे जिल्हा परिषद), रंजना तुषार माळी (नागोठणे पंचायत समिती), सुषमा नामदेव वाघमारे (सुकेळी पंचायत समिती), कल्पेश माने (कोलाड पंचायत समिती), संजय लोटणकर (आंबेवाडी पंचायत समिती), जोस्ना जगन्नाथ ठाकूर (न्हावे पंचायत समिती), अतुल पाटील (घोसाळे पंचायत समिती)

# श्रीवर्धनला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी पुन्हा फुटली

## निकृष्ट दर्जाच्या कामाचा कळस

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरापासून पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या रानवली पाझर तलावापासून श्रीवर्धन शहरातील साठवण टाकीपर्यंत जलवाहिन्या नवीन टाकण्याचे काम करण्यात आले होते, परंतु जलवाहिन्यांचे हे काम पूर्णत्वाकडे गेल्यानंतर जलवाहिन्या वारंवार फुटण्याचे प्रकार घडत आहेत.



जलवाहिन्या बदलण्याबरोबरच या ठिकाणी जलशुद्धीकरण प्रकल्प देखील उभारण्यात आला आहे. नवीन जलवाहिन्या पूर्णतः जमिनीखालून तीन ते चार फूट खोल खोदून टाकण्यात आलेल्या आहेत. वारंवार जलवाहिन्या फुटण्याच्या प्रकारामुळे श्रीवर्धन शहरातील अनेक भागांमध्ये काही वेळेला दोन दोन दिवस पाणीपुरवठा बंद बसतो. तर अनेक वेळेला पाणीपुरवठ्याला कोणत्याही प्रकारचे वेळापत्रक नसते. ज्या वेळेला पाणी उपलब्ध होईल, त्या वेळेला ते सोडण्यात येते. जसवली स्टॉप जवळील एका दुकानाच्या बाजूलाच जलवाहिनी फुटलेली आढळून आली व त्या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग होत होता.

हे पाणी संपूर्ण श्रीवर्धन हरिहरेश्वर मार्गावरती वाहून जात होते. तर बाजूला असलेल्या उर्दू शाळेचे पटांगण देखील पाण्याने भरून गेले होते. रविराज इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड या कोल्हापूरच्या कंपनीने सदर कामाचा ठेका घेतला होता, परंतु काम किती प्रमाणात निकृष्ट दर्जाचे करावे, याचा अक्षरशः कळस गाठल्याचे दिसून येत आहे. जलशुद्धीकरण प्रकल्प व जलवाहिन्या बदलणे हे जवळजवळ २० ते २२ कोटी रुपयांचे काम होते. एवढा खर्च करून श्रीवर्धनकरांना पाण्याची समस्या पुन्हा एकदा आली आहे.

राज्य सरकारने या कामाचे तज्ञ अभियंत्यांकडून ऑडिट करून घ्यावे व कामात त्रुटी आढळल्यास ठेकेदाराला ब्लॅक लिस्टमध्ये टाकावे, अशी मागणी श्रीवर्धनमधील नागरिकांकडून केली जात आहे.

## निवडक



### रसायनी पोलीस ठाण्यात ध्वजारोहण

**मोहोपाडा :** रसायनी पोलीस स्टेशन परिसरात ध्वजारोहण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वज फडकावण्यात आला. या वेळी पोलीस अधिकारी व कर्मचारी, पोलीस पाटील, स्थानिक नागरिक, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील शूरवीरांना आदरांजली अर्पण करण्यात आली. रसायनी पोलीस स्टेशनच्या वतीने प्रजासत्ताकदिनाचे महत्त्व सांगत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

### दिव्यांग बांधवाला ध्वजवंदनाचा मान

**चौक :** पंचायत समिती खालापूर येथे गट विकास



अधिकारी संदीप कराड यांनी भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने ध्वज वंदनाचा मान दिव्यांग बांधव दीपक पाटील यांना दिला. आपल्याला ध्वज वंदनाचा मान मिळेल असे कधीच वाटले नाही, पण क्रिया आणि कृतिशील अधिकारी यांच्या मुळे मान मिळाला, अशी भावना दीपक पाटील यांनी व्यक्त केली. या वेळी पंचायत समितीचे सर्व अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, ग्रामस्थ, माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलादपूर तालुक्याचा नियोजनबद्ध विकास सुरू -आमदार प्रवीण दरेकर

**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेसाठी ५ फेब्रुवारीला होणाऱ्या निवडणुकीनंतर पोलादपूर तालुक्याचा मागासलेपणाचा ठपका पुसून आगामी काळात नियोजनबध्द विकासाचे प्रयत्न सुरू करणार आहे, अशी ग्वाही भाजप गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी देवपूर येथील छोटेखानी प्रचारसभेत दिली. पोलादपूर तालुक्याचा दोन दिवसीय प्रचार दौरा आ.प्रवीण दरेकर यांनी केला. यावेळी आमदार दरेकर बोलत होते.



या वेळी जिल्हा परिषदेचे भाजपा-राष्ट्रवादी युतीचे उमेदवार कृष्णा कदम, पंचायत समितीचे उमेदवार सुरेंद्र चव्हाण, माजी जिल्हा उपाध्यक्ष मनोज भागवत, सुभाष दरेकर, बाबा शेठ, कॅप्टन काशीराम चव्हाण, गणपत महाडिक, श्रीपत जगदाळे, सुरेश सकपाळ, अरुण पवार, संजय महाडिक, चंद्रकांत पवार, विठोबा महाडिक, सुरेश पवार, राजाराम उफाळे, मोतीराम महाडिक, परेश पवार, दीपक महाडिक, प्रवीण महाडिक, तालुका अध्यक्ष मंगला झाडाणे, विशाखा महाडिक, नागेंद्र राठोड यांसह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते आणि मोठया संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

पहिल्या दिवशी आ. दरेकर यांनी कोंढवी, महालगूर, फणसकोंड, पळचिळ आदी गावांचा दौरा केला. दुसऱ्या दिवशी रविवारी देवपूर, परसूले, क्षेत्रपाल, कुडपण, कोतवाल, तुरुंबे बुद्रुक आदी गावांचा दौरा केला.

या वेळी आमदार दरेकर यांनी, पंतप्रधान मोदी देशाला जगात पुढे नेताहेत, राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस झपाटल्याप्रमाणे काम करताहेत. केंद्रात आणि राज्यात सत्ता असताना याचा फायदा माझ्या रायगड जिल्ह्याला, पोलादपूर तालुक्याला झाला पाहिजे. कमळ चिन्हाची उमेदवारी जिल्हा परिषदेला कृष्णा कदम तर पंचायत समितीसाठी सुरेंद्र चव्हाण यांना दिली आहे. एकदा विश्वास ठेवा आणि भाजपा-राष्ट्रवादी युतीच्या तीनही उमेदवारांना निवडून द्या. पोलादपूर तालुक्यातील गावच्या गावं ताकदीने विकसित करू, असेही आ. दरेकर यांनी आश्वासन दिले.

# आगरदांडा येथील मुस्लिम समाजाचा शिवसेनेत प्रवेश

**मुरूड : प्रतिनिधी**

स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांच्या विकासकावर प्रभावित होऊन व आगामी काळात आगरदांडा विकास कामे करून घेण्यासाठी आगरदांडा येथील मुस्लिम समाजाने शिवसेना शिंदे गटात जाहीर पक्ष प्रवेश केला आहे.



राजपुरी जिल्हा परिषद मतदार संघात शिवसेनेकडून विघ्नेश माळी हे निवडणुकीस उभे असून या पक्ष प्रवेशामुळे शिवसेनेचे स्थान बळकट होण्यास मोठी मदत होणार आहे. आतापर्यंत शिवसेनेचे राजपुरी जिल्हा परिषद मतदार संघातील उमेदवार विघ्नेश माळी यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. आगरदांडा येथील मुस्लिम समाजाने जाहीर पक्ष प्रवेश केल्याने निश्चितच शिवसेनेची ताकद वाढणार आहे. मी सर्व मुस्लिम समाजाचे स्वागत करीत असून विकास कामात आम्ही कधी ही कमी पडणार नसल्याचे प्रतिपादन विघ्नेश माळी यांनी केले.

या पक्ष प्रवेश करणाऱ्यांमध्ये साकिब गजगे, अफझल सोंडे, सईड लांडेगे, इरफान कादरी, अझ्मात दायंजी, अशफाक कादरी, ताहीर दायंजी, अहसान कादरी, मुदसर डावरे, अझन अल्वेरे, हिंदयात गजगे, उमेज कादरी, अमीर कादरी, नौशाद गजगे, अब्दुल सलाम गजगे आदी सह असंख्य लोकांनी पक्ष प्रवेश केला आहे.

या पक्षप्रवेश कार्यक्रमावेळी रायगड जिल्हा निवडणूक निरीक्षक ऋषिकांत डोंगरीकर बांधकाम कामगार सेना अध्यक्ष दिनेश मिनमिने रायगड जिल्हा युवा सेना उपाध्यक्ष दीपेश वरणकर युवा सेना नेते विघ्नेश माळी, जावेद हादादी, मुस्तकी हादादी आदी उपस्थित होते.

# उरणमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यात देशाचा ७७ वा प्रजासत्ताक मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तालुक्यातील मुख्य ध्वजारोहण उरण तहसील कार्यालयासमोर तहसिलदार डॉ. उद्धव कदम यांच्या हस्ते व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत उरण पोलिसांच्या वतीने मानवंदना देऊन देशाचा तिरंगा राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. तर उरण शहरातील उरण नगर परिषद कार्यालयासमोर व उरण पोलीस ठाणे येथेही ध्वजारोहण झाले.

उरण तालुक्यातील शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, पोलीस ठाणे, पोलिस दुरक्षेत्र पंचायत समितीसह रमाबाई आंबेडकर वसतिगृह विंधने व सर्वच शासकीय आस्थापना आणि सहकारी संस्थांच्या वतीने तिरंग्या ध्वजास मानवंदना देण्यात आली. वंदे मातरम, भारत माता की जय छत्रपती शिवाजी महाराज की जय असा जयघोष आणि देशभक्तिपर गीतांनी सारा परिसर सकाळच्या सुमारास दुमदुमून गेला होता.

तालुक्यातील विविध शाळांतील विद्यार्थी, विद्यार्थिनींचे विविध गुणदर्शन सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. यामध्ये चिरनेर येथील आदिवासी आश्रम शाळेतील दुर्बल घटक असलेल्या आदिवासी विद्यार्थी, विद्यार्थिनींनी विविध गुण दर्शनाच्या कार्यक्रमात केलेले सादरीकरण वाखाणण्याजोगे होते.

# वातावरणीय बदलाने कडधान्य, आंबा, काजूला धोका

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात गेल्या दोन तीन वर्षांपासून होत असलेल्या वातावरणीय बदलाचा फटका कडधान्य, आंबा, काजू, शेवगा इत्यादी पिकांना बसत आहे.



गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण असल्याने कडधान्य फुलायला लागले असून शेवगा, कडधान्य लागण्यास सुरुवात झाली आहे, मात्र या वातावरणामुळे फुल गळण्याचा धोका निर्माण झाला आहे. तसेच आंबा, काजूला मोहर लागला आहे. हा मोहर या ढगाळ वातावरमुळे गळून आंबा, काजूच्या पिकास धोका होईल, असे शेतकरी वर्गातून बोलले जात आहे.

आता सर्वच पिके चांगली बहरास आली असून चांगले उत्पन्न मिळेल असा अंदाज शेतकरी वर्गातून होत आहे. शेतकरीवर्ग आनंदी दिसत आहे.मात्र गेल्या दोन दिवसांपासून वातावरणीय बदलाचा धोका होण्याचा संभव आहे. असेच जर का वातावरण राहीले तर कडधान्य पिकांचे नुकसान होईल असे चित्र पहावयास मिळेल.या वातावरणीय बदलांमुळे शेतकरी वर्ग चिंतेत असल्याचे पहावयास मिळाले.

# शाळांमध्ये देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये देशाचा ७७वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरूस्ती, व्यायामाची आवड, शिस्त, ऐक्याची भावना व देशभक्तीची जाणीव निर्माण व्हावी यासाठी प्रत्येक तालुक्यातील तीन निवडक मोठ्या शाळांमध्ये इतर काही शाळा एकत्र करून तसेच जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये देशभक्तीपर गीतांबर सामूहिक कवायत संचलन घेण्यात आले.



विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावना, शिस्त, आरोग्य जागृती आणि देशभक्तीचे संस्कार रूजवण्यासाठी तीन हजार ५४८ शाळांमधील जवळपास पाच लाख ३५ हजार ३८० विद्यार्थ्यांनी व २० हजार ६५७) शिक्षकांनी सहभाग घेतला होता.

जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली ७७ वा प्रजासत्ताक दिन हा कार्यक्रम यशस्वीपणे साजरा करण्याकरीता शिक्षणाधिकारी (प्राथमिक) ललिता दहितुले तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) महारूद्र नाळे, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) व सर्व गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक यांनी काम केले.



# हळदीकुंकू समारंभाने महिलांमधील आपुलकी, सलोखा वृद्धींगत

**म्हसळा : प्रतिनिधी**

मातोश्री पार्क येथे मकर संक्रांतीनिमित्त आयोजित करण्यात आलेला हळदीकुंकू समारंभ हा शहरातील महिलांमधील आपुलकी, सलोखा आणि स्नेहबंध अधिक दृढ करणारा सामाजिक उत्सव ठरला.

कुंभार, सोनार, तांबट (त्वष्टाकासार), ब्राह्मण, नाभिक, परीट, शिंपी, वाणी, मराठा आदी समाजातील तसेच उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, राजस्थान, गुजरात आदी विविध राज्यांतून उद्योग, व्यवसाय, नोकरी व रोजंदारीसाठी आलेल्या बहुभाषिक कुटुंबांतील महिलांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

मातोश्री पार्कमधील विभा खांबेटे यांच्या अध्यक्षतेखाली रोहिणी पाटील, निकिता कळस, धनश्री मुंडे, दक्षता घोले, सानिका उद्धरकर, सायली जंगम, मेघना कदम, उषाताई गीते, ज्योती पवार, पूजा देशपांडे, श्रुती सोनावणे तसेच अन्य रहिवासी महिलांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

या समारंभात सुमारे २६ महिला सदस्यांनी सक्रीय सहभाग घेत सुमारे ३८० ते ४०० महिलांना हळदी-कुंकू लावणे, फुल देणे, ओटी भरणे, औक्षण करणे व वाण देणे अशा पारंपरिक सांस्कृतिक उपक्रम उत्साहात पार पाडले.

यावेळी उपस्थित असलेल्या नगरसेविका व म्हसळा नगरपंचायतीच्या पर्यटन सभापती राखी करंबे यांनी मातोश्री पार्कमधील हा उपक्रम महिलांमधील आपुलकी, सलोखा व स्नेहबंध वृद्धिंगत करणारा ठरला आहे, अशी प्रतिक्रिया दिली.

# भाजप महायुतीचा जोरदार प्रचार

## जि.प., पं.स. निवडणुकीत भाजप महायुतीचाच विजय होईल -परेश ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेतकरी कामगार पक्ष हा केवळ नावापुरताच पुरोगामी राहिला असून सत्तेसाठी कोणत्याही थराला जाऊन युती करण्याची त्यांची तयारी असते. मात्र, जनतेचा विश्वास केवळ भारतीय जनता पार्टीच्या विकासकामांवर आहे. त्यामुळे आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजप महायुतीचाच विजय होईल आणि विकासाचा झेंडा फडकेल, असा ठाम विश्वास पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी व्यक्त केला.

आगामी निवडणुकीसाठी महायुतीने उरणमध्ये जोरदार मोर्चेबांधणी केली असून, चिरनेर जिल्हा परिषद गटाचे उमेदवार देवेंद्र पाटील आणि आवरे पंचायत समिती गणाच्या उमेदवार समिधा म्हात्रे यांच्या प्रचाराचा नारळ उरण नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष रविशेठ भोईर यांच्या हस्ते आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी आवरे येथे फोडण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना परेश ठाकूर यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून सुरू असलेल्या मविकासाच्या कामांचा पाढा वाचला. ते म्हणाले की, सर्वसामान्य जनतेला आता शाब्दिक आश्वासने नको तर ठोस विकास हवा आहे, जो केवळ भाजपच देऊ शकते. विकासकामांची ही गती कायम राखण्यासाठी महायुतीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन त्यांनी या वेळी केले.

या प्रचार शुभारंभाला भाजप जिल्हा कमिटी सदस्य निलेश म्हात्रे, उरण ग्रामीणचे मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, महिला अध्यक्षा राणी म्हात्रे, तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, सारडे सरपंच रोशन थळी, तालुका उपाध्यक्ष मुकेश म्हात्रे, विभागीय अध्यक्ष शशिकांत पाटील यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



## वासांबे येथे मतदारांसोबत संवाद

**रसायनी : प्रतिनिधी**

आज सकाळपासून वासांबे ग्रामपंचायत हद्दीतून जिल्हा परिषद उमेदवार नेहा भुषण पारंगे व पंचायत समिती उमेदवार कृष्णा पारंगे यांनी रिस कांबा व चाभारली या भागातील सर्व ग्रामस्थ व सोसायटीच्या प्रत्येक भागातील मतदार यांच्याबरोबर संवाद साधला व भाजपाच्या उमेदवारांना निवडून द्या, असा प्रचार केला.

मध्ये नेहा भूषण पारंगी जिल्हा परिषद उमेदवार व कृष्णा पारंगी पंचायत समिती उमेदवार यांच्याबरोबर अनेक पदाधिकारी ग्रामपंचायत सदस्य व अनेक पाठिंबा देणारे कार्यक्रते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. महिला वर्ग पण मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

या भागातील मातोश्री संकुल, आंबे स्मृती, गुलमोहोर सोसायटी, गणेश नगर दुर्गामाता कॉलनी हा भाग अक्षरक्षा पिंजून काढला यामध्ये प्रत्येक घरामध्ये जाऊन लोकांना परिचय दिला आणि आपली ओळख करून दिली. या वेळी त्यांच्याबरोबर शेकडेच्या संख्येने भाजपचे कार्यकर्ते शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते असे अनेक पदाधिकारी ग्रामपंचायत सदस्य हे या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पाठिंबा देत होते आणि हा सर्व भागात मोठा प्रचार केला.



## हर्षदा घरत, योगिता लहानेंना विजयी करा -अरुणशेठ भगत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या खंबीर नेतृत्वाखाली विकासाची अनेक मोठी कामे पूर्ण झाली आहेत. हा विकासाचा झंझावात भविष्यातही असाच सुरू ठेवण्यासाठी आणि मतदारसंघाच्या प्रगतीसाठी पळस्पे जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार हर्षदा घरत आणि कोन पंचायत समिती गणाच्या उमेदवार योगिता लहाने यांना उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी बेलवली येथे आयोजित लाडक्या बहिणींच्या मेळाव्यात केले.



बेलवली येथे सोमवारी लाडकी बहीण मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्याचे मुख्य आकर्षण म्हणजे महिलांसाठी आयोजित करण्यात आलेले विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि खेळ, ज्यामध्ये स्थानिक महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. या वेळी अरुणशेठ भगत यांनी, केंद्र व राज्य सरकारच्या महिलाभिमुख योजनांची माहिती दिली आणि विकासाच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन केले.

या मेळाव्याला भाजपचे पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, सतिश पाटील, पनवेल महापालिकेच्या नगरसेविका सरस्वती काथारा, रामदास खेत्री, तुळशीराम पाटील, अप्पा भागीत, मच्छिंद्र पाटील, भालचंद्र पाटील, नारायण भोपी, हेमंत तांडेल, जितेश बताले, संदेश लहाने, योगेश लहाने, अनंता पवार यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

दरम्यान, पनवेल तालुक्यातील पळस्पे जिल्हा परिषद गट आणि कोन पंचायत समिती गणामध्ये भारतीय जनता पार्टी महायुतीने प्रचाराचा वेग वाढवला आहे. महायुतीच्या पळस्पे जिल्हा परिषदेच्या उमेदवार हर्षदा घरत आणि कोन पंचायत समितीच्या उमेदवार योगिता लहाने यांचा सोमवारी बेलवली परिसरात जोरदार प्रचार करण्यात आला. भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रचार दौरा पार पडला. या वेळी कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद साधला आणि सरकारच्या माध्यमातून झालेल्या विकासकामांची माहिती दिली.

## वावंजे जि.प. गट व पंचायत समिती गणात महायुतीचे शक्तिप्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात सुरू असलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप महायुतीच्या प्रचाराने वेग घेतला असून वावंजे जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणात महायुतीच्या उमेदवारांनी प्रभावी प्रचार करत आघाडी घेतली आहे. खैरणे आणि कानपोली परिसरात काढण्यात आलेल्या पदयात्रांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी तसेच ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या नेतृत्वाखाली महायुतीच्या उमेदवारांनी मतदारांच्या गाठीभेटी घेत विकासकामांची माहिती दिली. महायुतीच्या माध्यमातून झालेल्या विविध विकास प्रकल्पांमुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून प्रचारादरम्यान त्याचा स्पष्ट प्रत्यय येत आहे.

वावंजे जिल्हा परिषद गटातून उमेदवार कमला देशेकर आणि वावंजे पंचायत समिती गणातून उमेदवार आरती काठे यांच्या प्रचारासाठी कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. गावोगावी प्रचार करत मतदारांशी थेट संवाद साधण्यात आला. या प्रचारावेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, भाजप नेते एकनाथ देशेकर, पनवेल महापालिकेच्या नगरसेविका सीता पाटील यांच्यासह नगरसेविका अरुणा दाभणे, शिवाजी दुर्गे, कृष्णा पाटील, डॉ. मोतीराम कोळी, नाथा आगलावे, जनार्दन आगलावे, काजल पाटील, माजी दिलीप वास्कर, महेश पाटील, वासुदेव पाटील, राजेंद्र गोंधळी, चंद्रकांत गोंधळी, प्रभाकर पाटील, सुरेश पोरजी, अंकुश पाटील, कैलास मढवी, वासुदेव चोरमेकर, सज्जन पवार, रमेश मते, गोमा पाटील, संजोग पाटील, भार्गव सांगडे, बाळकृष्ण पाटील, निवृत्ती पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा परिषद उमेदवार कमला देशेकर यांनी यापूर्वी सरपंच म्हणून केलेल्या उत्कृष्ट कामाचा जनतेला अनुभव आहे, तर पंचायत समिती उमेदवार आरती काठे या सामाजिक कार्यात सातत्याने सक्रिय राहिल्या आहेत. जनतेमध्ये जाऊन प्रत्यक्ष काम करणे हा त्यांचा स्वभाव असल्याने दोन्ही उमेदवारांना मतदारांचा वाढता पाठिंबा मिळत असल्याचे चित्र आहे.



## नेरे येथे लाडक्या बहिणींचा मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील नेरे येथे रविवारी प्रगती महिला मंडळ आणि गावदेवी महिला मंडळ नेरे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लाडक्या बहिणींचा मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला.

या मेळाव्याला भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, नेरे जिल्हा परिषद गटातील भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार आत्माराम भस्मा, नेरे पंचायत समिती गणातील उमेदवार वर्षा केवारे, नगरसेवक विकास घरत, रोशन पाटील, यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी उपस्थित महिलांशी संवाद साधताना उमेदवारांनी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती दिली आणि विकासाच्या प्रवाहात सहभागी होण्याचे आवाहन केले. नेरे आणि परिसरातील महिलांनी या मेळाव्याला उदंड प्रतिसाद दिला, ज्यामुळे संपूर्ण गावात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

महिलांचा उत्साह द्विगुणित करण्यासाठी या मेळाव्यामध्ये सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रम तसेच महिलांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. विजेत्या महिलांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी प्रगती महिला मंडळ आणि गावदेवी महिला मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांमुळे महिलांच्या जीवनात समृद्धी -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांमुळे समाजातील प्रत्येक महिलेचा स्वाभिमान जागा झाला असून, या योजना त्यांच्या जीवनात समृद्धी आणत असल्याचे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. पनवेल तालुक्यातील वावंजे येथे आयोजित लाडकी बहीण मेळाव्यात ते बोलत होते.





या वेळी त्यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भाजप उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहनही केले. वावंजे येथे रविवारी झालेल्या या मेळाव्यात महिलांसाठी विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम आणि खेळांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली.

या मेळाव्याला महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या वेळी संवाद साधताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, आपल्या परिसराचा विकास वेगाने होत असून नवनवीन उद्योग आणि रस्ते प्रकल्पांमुळे रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. भारतीय जनता पार्टीने नेहमीच शेतकरी आणि स्थानिकांच्या हिताचे रक्षण केले आहे. मग तो एमआयडीसीचा प्रकल्प असो वा रस्त्यांचा, प्रकल्पग्रस्तांवर अन्याय होऊ नये यासाठी पक्ष नेहमीच दक्ष राहिला आहे आणि भविष्यातही या प्रकल्पांचा सर्वाधिक फायदा स्थानिकांनाच मिळावा यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत अशी ग्वाही दिली. तसेच येणाऱ्या ५ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी मतदात होणार आहे. या निवडणुकीत वावंजे जिल्हा परिषदेसाठी कमला देशेकर आणि वावंजे पंचायत समितीसाठी आरती काठे निवडणुकीच्या रिंगणात आहे. त्यांना मकमळफया चिन्हासमोरील बटण दाबून प्रचंड बहुमताने विजयी करावे, असे आवाहन केले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, एकनाथ दिशेकर, नगरसेवक दशरथ म्हात्रे, नगरसेविका सीताताई पाटील, दिनेश खानवकर, संतोष पाटील, शिवाजी दुर्गे, युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष आनंद दवळे, डॉक्टर मोतीराम कोळी, नाथा आगलावे, कृष्णा पाटील, जनार्दन आगलावे, काजल पाटील, अरुणा दाभणे, दिलीप वास्कर, महेश पाटील, वासुदेव पाटील, राजेंद्र गोंधळी, चंद्रकांत गोंधळी, प्रभाकर पाटील, सुरेश पोरजी, अंकुश पाटील, वासुदेव चोरमेकर, कैलास मढवी, सज्जन पवार, रमेश मते, गोमा पाटील, संजोग पाटील, भागर्व सांगडे, बाळकृष्ण पाटील, निवृत्ती पाटील, अमर ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## एमएनएम स्कूल व टीएनजी कॉलेजचे स्नेहसंमेलन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकाराम नारायण घरत ज्युनियर कॉलेजमधील विद्यार्थी आज राज्य आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकदार कामगिरी करत असून ही बाब आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानास्पद आहे, महाराष्ट्रातील एक नामवंत शैक्षणिक संस्था म्हणून हे विद्यालय नावारूपास येत असल्याचे, असे गौरवोद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वार्षिक स्नेहसंमेलनावेळी काढले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम. एन. एम. विद्यालय आणि टी. एन. जी. ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सचा २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक सक्हेसंमेलन व बक्षीस वितरण समारंभ मकृतज्ञताफ या संकल्पनेखाली संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत उत्साहात साजरा झाला. शाळेच्या भव्य पटांगणावर संपन्न झालेल्या या सोहळ्याप्रसंगी भूतकाळाची दखल, वर्तमानाचे कौतुक आणि भविष्यासाठी प्रेरणा हे ब्रीदवाक्य समोर ठेवून विद्यार्थ्यांनी बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, संस्थेचे उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख, भार्गव ठाकूर, सदस्य ॲड्वोकेट राहुल घरत, न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, प्राचार्या सायली वाडवलकर यांच्यासह अनेक मान्यवर, पदाधिकारी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या वैविध्यपूर्ण सांस्कृतिक कलागुणांनी उपस्थितांची मने जिंकली. उत्कृष्ट नियोजन आणि विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध सादरीकरणामुळे हा वार्षिक सक्हेसंमेलन सोहळा खऱ्या अर्थाने संस्मरणीय ठरला.



**पनवेल : येथील गुजराती शाळेमध्ये नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी मुख्याध्यापिका वैशाली त्रिवणी, लिटील वर्ल्डचे शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.**

## संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संविधान अमृत महोत्सवाच्या निमित्ताने तसेच हर घर संविधान या अभियानांतर्गत भारताच्या संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन सोमवारी (दि. २६) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले.

या कार्यक्रमास विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे, महापालिका नवनिर्वाचित सदस्य, उपविभागीय अधिकारी पवन चांडक, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, तहसीलदार मीना भांबरे, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ.राजू पाटोदकर, महापालिका अधिकारी व कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडणुकीची रणधुमाळी

## मुरुड, खालापुरात जि.प., पं.स. प्रचाराचा फुटला नारळ

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील कोर्लई जिल्हा परिषद गट, कोर्लई पंचायत समिती गण व बोर्ली पंचायत समिती गण निवडणूक प्रचाराचा शुभारंभ चेहेर येथील विठ्ठल रखुमाई मंदिराचे प्रांगणात श्रीफळ वाढवून करण्यात आला.

कोर्लई जिल्हा परिषद गटामध्ये भोईघर येथील शिवसेनेनेच्या ज्योती रमेश नांदगावकर, कोर्लई पंचायत समिती गणात चेहेर येथील स्वाती आशिष चवरकर आणि बोर्ली पंचायत समिती गणात बारशीव येथील निलेश शांताराम घाटवळ हे निवडणूक लढवित आहेत.

चेहेर येथील विठ्ठल रखुमाई मंदिराचे प्रांगणात ज्येष्ठ नागरिक यांचे हस्ते श्रीफळ वाढवून प्रचाराचा श्रीफळ वाढविण्यात आला. प्रारंभी विठ्ठल रखुमाई मंदिरात पूजा-अर्चा उमेदवारांचे हस्ते करण्यात आली.



या कार्यक्रमास शिवसेना उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, रमेश उर्फ बाबू नागावकर, शिवसेना उपतालुकाप्रमुख भगिरथ पाटील, युवासेना मुरूड तालुकाप्रमुख अमोल लाड, चंद्रकांत मोहिते, मांडळा माजी सरपंच सुचिता पालवणकर, साक्षी गायकवाड, शैलेश रातवडकर, तळेखारच्या माजी सरपंच निर्मला म्हात्रे तसेच ग्रामस्थ व महिला यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

या वेळी बोलताना भरत बेलोसे यांनी, कोर्लई जिल्हा परिषद गटात आमदार महेंद्र दळवी यांनी मोठा निधी उपलब्ध करून येथील सर्वांगीण विकासाला योगदान दिले आहे. या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत आमदार महेंद्र दळवी यांचे हात बळकट करण्यासाठी शिवसेनेच्या तिन्ही उमेदवारांना बहुमताने निवडून द्यावे, असे आवाहन केले.



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूरच्या आत्करगाव जिल्हा परिषद गटातील भाजप उमेदवार रेश्मा राजेश पाटील आणि खाणाव पंचायत समिती गणातील शिवसेना उमेदवार भाई शिंदे यांच्या प्रचाराचा नारळ आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत वाढवण्यात आला.

या वेळी रानसई येथील श्री झोलाई डोलाई माता मंदिरात मोठ्या भक्तीभावाने पूजन करीत प्रचार पत्रक आईच्या चरणी ठेऊन प्रचाराला सुरुवात करण्यात आली. ज्येष्ठांचे आशीर्वाद आणि माता भगिनींच्या औक्षणाने गावागावातील वातावरण विजयी झाले होते. या प्रचारावेळी ज्येष्ठ शिवसेना नेते विजय पाटील, माजी जिल्हा परिषद सभापती नरेश पाटील, माजी सभापती एच.आर. पाटील, तालुकाप्रमुख संदेश पाटील, भाजप युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष नागेश पाटील, युवासेना तालुकाध्यक्ष प्रमोद शिर्के, सरपंच प्रकाश पाटील, माजी उपसरपंच संदीप पाटील, गणेश पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रीवर्धनमध्ये वाहतूक कोंडी

## पोलीस यंत्रणाही हतबल

**श्रीवर्धन : बातमीदार**

जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे श्रीवर्धन परिसरामध्ये पर्यटकांनी क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश केल्याने प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. असंख्य आलेल्या पर्यटकांच्या संख्येमुळे व त्यांच्या वाहनांमुळे पोलीस प्रशासनदेखील हतबल झाल्याचे पहायला मिळाले.

पोलिसांनी पार्किंगसाठी श्रीवर्धन येथील र.ना. राऊत विद्यालयाच्या मागील पटांगण ताब्यात घेतले आहे, जेणेकरून शहरातील नागरिकांना पार्किंगचा त्रास होणार नाही, मात्र या ग्राउंडवर जवळजवळ हजार ते दीड हजार गाड्या उभ्या करूनसुद्धा श्रीवर्धन शहरातील अनेक रस्त्यांवर शेकडो वाहने उभी होती, तर श्रीवर्धन येथील स्मशानभूमी असलेल्या मठाच्या गवंड परिसरातदेखील रस्त्याच्या दुतर्फा वाहने उभी असल्यामुळे सर्वत्रच वाहतूक कोंडी झालेली दिसून आली.

पार्किंगच्या समस्येबरोबरच श्रीवर्धन शहरातील अरुंद रस्ते हीसुद्धा एक मोठी समस्या आहे. शहरातील रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी लोकांच्या जागेवर खुणा करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे लवकरात लवकर रुंदीकरण करण्याचा प्रश्नदेखील मार्गी लावण्यात यावा, अशी मागणी होत आहे.



# पेणमध्ये विद्यासंकुलात चोरी; चोरटे सीसीटीव्हीत कैद

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील शिक्षणाचे माहेरघर असणाऱ्या पेण प्रायव्हेट हायस्कूल व सौ. म.ना. नेने कन्या विद्यालयातील ऑफिसमध्ये कपाटे फोडून चोरट्यांनी एकूण ३० हजार ५१८ रुपये चोरून नेल्याची घटना घडली.

याबाबत मुख्याध्यापक राजेंद्र पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार रात्री १.३० ते ३च्या दरम्यान अज्ञात तीन चोरट्यांनी प्रायव्हेट हायस्कूल व सौ. म.ना.नेने कन्या विद्यालय येथील ऑफिसचे दरवाज्याचे कुलूप तोडून व आतील लोखंडी कपाटे फोडून त्या कपाटातील



एकूण ३० हजार ५१८ रुपयांचा रोख रक्कम व वस्तू चोरून नेल्या.

घटनास्थळी पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी भेट दिली. चोरटे सीसीटीव्हीत कैद झाले आहेत. अज्ञात चोरट्यांविरोधात पेण पोलीस ठाण्यात कलम ३०५ (अ), ३३१ (३),३३१ (४), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास हवालदार प्रकाश कोकरे करीत आहेत.

# अलिबाग जिल्हा कारागृहात बंदीवानांसाठी विविध स्पर्धा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

कारागृहातील बंद्यांनाही स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाची तसेच प्रजासत्ताक दिनाची जाणीव व्हावी तसेच त्यांना देशाविषयी आपुलकी वाटावी व स्वत:चा आत्मविश्वास वाढावा याकरिता अलिबाग जिल्हा कारागृहात प्रजासत्ताक दिनी देशभक्तीपर स्पर्धा घेण्यात आल्या.

यामध्ये देशभक्तीपर गीते, रांगोळी, मेहंदी, चित्रकला, बुद्धिबळ, कॅरम व देशभक्तीपर निबंध स्पर्धा झाल्या. या स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या बंद्यांना रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस शिक्षणाधिकारी (प्राथमिक) ललिता दहितुले आणि महारुद्रा नाले (माध्यमिक)



यांनी मनोगत व्यक्त करताना बंद्यांचे भावी जीवनात शिक्षणाचे महत्व सोप्या भाषेत समजावून सांगितले तसेच बंद्यांना कारागृहात दाखल असताना तसेच कारागृहातून सुटून बाहेर पडल्यावर पुढील शिक्षण कसे प्राप्त करता येईल याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

यानंतर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी प्रथम कारागृहातील सर्व बंद्यांना प्रजासत्ताक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. त्यानंतर बंदी कारागृहात दाखल असताना जिल्हा उद्योग केंद्र व जिल्हा कौशल्य विभाग यांच्यामार्फत घेतल्या जाणाऱ्या प्रशिक्षणात सहभागी होऊन प्रशिक्षण घेण्याबाबत मार्गदर्शन केले तसेच या प्रशिक्षणाच्या माध्यमातून बंद्यांनी या प्रशिक्षणांत सहभाग घेतल्यास बंदी आत्मनिर्भर होऊन त्यांना रोजगार उपलब्ध होईल तसेच स्वत:ची व कुटुंबाची जबाबदारी योग्यरित्या सांभाळून त्यांचा उदर निर्वाह करु शकतात असे सांगून बंदी पुनर्वसनासाठी जास्तीत जास्त बंद्यांनी हे प्रशिक्षण घेण्याबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाची सुरुवात अधीक्षक, अलिबाग जिल्हा कारागृह विशाल बांदल यांच्यामार्फत उपस्थित मान्यवरांचे स्वागत करुन करण्यात आली.

या कार्यक्रमाकरिता अधीक्षक अलिबाग जिल्हा कारागृह, वर्ग-२, विशाल बाळासाहेब बांदल, मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामीण प्रगती फाऊंडेशन श्रीवर्धन मंगेश डफळे, उपाध्यक्ष प्रबोधन सामाजिक सेवा संस्था अलिबाग डॉ.मिलिंद पाटील, प्रतिनिधी प्रयास सामाजिक संस्था मुंबई ॲड.निलेश मोहिते, प्रबोधन सामाजिक सेवा संस्थेच्या प्रशिक्षक प्रांजली माळी, सतिश मोडखरकर, प्रचिती भगत, हर्षदा दांडेकर तसेच अलिबाग जिल्हा कारागृहातील अधिकारी किशोर महादेव वारगे,तु.अ.श्रेणी-२, निशिगंधा माळी, वैद्यकीय अधिकारी, रामहरी कुटे, सुभेदार व देवलु केरबा रांजड, सुभेदार व तसेच अविनाश जाधव, गजानन खवळे, नितीन भोईर, शिपाई तसेच भारती शेवाळे, शिपाई उपस्थित होते.

# मायबाप आपले दैवत, त्यांची मनापासून सेवा करा

## हभप पुरुषोत्तममहाराज पाटील यांचे आवाहन

**खोपोली : प्रतिनिधी**

युवा कीर्तनकार हभप पुरुषोत्तममहाराज पाटील (बुलडाणा) यांनी खालापूर तालुक्यातील नावंढे गावात कीर्तनरुपी सेवेतून मार्गदर्शन करताना, या विश्वातील चालते बोलते दैवत मायबाप आहेत, म्हणून त्यांची मनापासून सेवा करा, असे आवाहन केले.

नावंढे गावात गेल्या अनेक वर्षाची परंपरा कायम ठेवत नरेश हाडप, नंदेश हाडप, निलेश हाडप यांच्या वतीने गणपती बाप्पाची पूजाअर्चा करत धार्मिक व समाज प्रबोधनाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेरळी पंचक्रोशीमधील वारकरी मंडळी, तरुणाई, ग्रामस्थ व महिलावर्ग उपस्थित होता.

हभप पुरुषोत्तममहाराज पाटील पुढे मार्गदर्शन करताना म्हणाले की, पैसा कमवा,




पण लोकांना फसवून पैसे कमवू नका. वारकरी संप्रदायासारखी विचारांची बैठक जगाच्या पाठीवर कुठेच नसल्याने वारकरी संप्रदायाचे सेवक व्हा, असेही त्यांनी नमूद केले.

# धारकऱ्यांची लोहगड ते भिवगड मोहीम उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या माध्यमातून दरवर्षी आयोजित करण्यात येणारी धारातीर्थ गडकोट मोहीम यंदा किल्ले लोहगड ते किल्ले भिवगड (मार्गे एकवीरा देवी व राजमाची गड) अशी झाली. या मोहिमेत कर्जत तालुक्यातील गौरकामत येथे असलेल्या किल्ले भिवगड येथे संभाजी भिडे यांच्या उपस्थितीने कर्जत तालुक्यातील धारकऱ्यांमुळे नवचैतन्य दिसून आले.

धारातीर्थ गडकोट मोहिमेसाठी देशभरातून हजारो धारकरी सहभागी झाले होते. खासगी वाहनांनीही काही



धारकरी मुक्कामाच्या ठिकाणी पोहचले. कर्जत खालापूर विभागाच्या वतीने कर्जत तालुक्यातील गौरकामथ ग्रामपंचायत हद्दीत भिवगडाच्या पायथ्याशी जवळपास ३५ हजारपेक्षा अधिक धारकऱ्यांचा मुक्काम होता. मोहिमेला भिडे गुरुजींची उपस्थित होती.

भिडे गुरुजी रस्तेमार्गे कर्जत शहरात दाखल होताच असंख्य धारकऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. आमदार महेंद्र थोरवे यांनी उभारलेल्या प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ५२ फूट उंचीच्या श्री विठ्ठलाच्या मूर्तीचे त्यांनी दर्शन घेतले. तेथे आमदार थोरवे यांनी स्वागत केले. या वेळी नगरसेवक संकेत भासे, किशोर कदम, ज्ञानेश्वर कर्णूक आदी उपस्थित होते.

मुरबाड राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावरील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला भिडे गुरुजींनी अभिवादन केले. शिवशंभूच्या विचारांचा जागर करत ही मोहीम पुढे सरकत होती. दरवर्षी वेगवेगळ्या गडकोट मोहिमा आयोजित केल्या जातात. यंदाच्या मोहिमेत सुमारे ३५ हजार धारकरी प्रत्यक्ष पायी चालत सहभागी झाले होते. धारकऱ्यांच्या शिस्तीचे दर्शन कर्जतकरांनी अनुभवले असून भिडे गुरुजींच्या मार्गदर्शनानंतर शिस्तबद्ध वातावरणात या धारातीर्थ गडकोट मोहिमेची सांगता करण्यात आली.

# पेणमध्ये ठिकठिकाणी ध्वजारोहण

**पेण : प्रतिनिधी**

प्रजासत्त दिनानिमित्त पेणमध्ये ठिकठिकाणी कार्यक्रम झाले. या वेळी पेण प्रांत कार्यालयात प्रांताधिकारी प्रवीण पवार यांच्या हस्ते आणि आमदार रविशेठ पाटील, तहसीलदार तानाजी शेजाळ यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण झाले.

पेण नगर परिषदेचे ध्वजारोहण मुख्याधिकारी नगराध्यक्ष प्रितम पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी नगरसेवक, कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते, तर प्रांत कार्यालयातील ध्वजारोहणासाठी पेण तालुक्यातील राजकीय पक्षाचे नेते, कार्यकर्ते तसेच शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

पेण एज्युकेशन सोसायटीच्या सौ.म.ना. नेने कन्या विद्यालयाच्या पटांगणावर शालेय व कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी परेड, देशभक्तीपर गीतांचे गायन, नृत्य, लेझीम आदी कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर करुन जमलेल्या सर्व विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी अध्यक्ष ॲड. मंगेश नेने यांनी सलामी स्वीकारली. येथील ध्वजारोहण प्राचार्य राजेंद्र पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. पाटणेश्वर बँकेत अध्यक्ष प्रतिभा पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.

या वेळी न्यू व्हिजन कॉलेज, सार्वजनिक विद्यामंदिर, के ई एस इंग्लिश मिडीयम स्कुल, कारमेल स्कुल, कोनायसन्स स्कुल, मदार तेरेसा इंग्लिश स्कूल, पतंगराव कदम कॉलेज, महात्मा गांधी स्मारक संस्था आदींसह नगर परिषद शाळा, ग्रामपंचायत व शासकीय कार्यालय आदी ठिकाणी ध्वजारोहण झाले.

प्रांत कार्यालय येथे मानवंदना परेड घेण्यात आली. यामध्ये चार तुकड्यांनीने भाग घेतला होता तसेच पेण पोलीस ठाणे, म.ना. नेने कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनी, पेण प्रायव्हेट हायस्कूल ज्युनिअर कॉलेजचे विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नायब तहसीलदार प्रसाद कालेकर यांनी केले.



# डॉ. महेश निमणे पुरस्काराने सन्मानित



**खोपोली : प्रतिनिधी**

राष्ट्रीय प्रेरणा किरण गौरव सन्मान सोहळा नुकताच फॉर्चून मॉल इचलकरंजी, कोल्हापूर येथे झाला. या कार्यक्रमात सिनेअभिनेत्री प्रतीक्षा लोणकर यांच्या हस्ते सन्मानपत्र मेडल आणि ट्रॉफी देऊन खोपोलीचे डॉ. महेश एकनाथ निमणे यांना सन्मानित करण्यात आले.

गेली अनेक वर्ष वास्तु सुख फाऊंडेशन आणि सुखी वास्तु स्पिरीचुअल सर्व्हिसेसच्या माध्यमातून डॉ. निमणे कार्यरत आहेत. कार्यक्रमास एजे फाऊंडेशनच्या अध्यक्ष डॉ. अबोली जिगजिनी, समृध्दी प्रकाशनचे संस्थापक डॉ.बी.एन. खरात आदी उपस्थित होते.

# थेरोंडा येथे म्हसोबाची जत्रा उत्साहात

**रेवदंडा : प्रतिनिधी**

प्रतिवर्षाप्रमाणे सातारा जिल्ह्यातील विविध तालुका व गावातील भाविक ग्रामस्थांचे परंपरागत म्हसोबा यात्रेसाठी आगमन झाले आहे. या वर्षीसुध्दा मोठ्या जल्लोषात, उत्साहाने म्हसोबा देवाला मानपानाचा धार्मिक विधी होत आहे.

पिढ्यान्‌पिढ्या चालत असलेल्या रितीरिवाजाप्रमाणे सातारा जिल्हांतील ही कुंटूबे ठिकठिकाणी गावागावातून रोजदारी, व्यवसाय करून शिमग्याचे पूर्वी थेरोंडा येथे एकत्रित येत असत. आगळेचीवाडीनजीक राहुटी उभारून यामध्ये ही कुटूंबे वस्तीस राहत असत. तेथेच हिंदू कोलाटी जातीच्या मोरे, जावळे, लाखे, लघु जावळे आदी आडनावाच्या कुटूंबाचे कुलैदवत मंदिर आहे.

पूर्वी रोजदांरी व्यवसायासाठी आलेली सातारकर कुटूंबे राहुटी उभारून वस्ती करत असावे. त्यामुळे त्यांचे कुलैदवत असलेले हे मंदिर एका पत्राशेडमध्येच होते, मात्र सध्या पत्राशेडमधील मंदिराचा गाभारा तसाच ठेवत मंदिराचा जीर्णोध्दार करण्यात आला आहे. दरवर्षी सातारा जिल्ह्यातील विविध गावातून हिंदू कोलाटी जातीच्या मोरे, जावळे, लाखे, लघू जावळे आदी आडनावाची कुंटूबे येऊन म्हसोबा यात्रा व रेवदंडा थेरोंडा मध्ये धार्मिक विधी पार पाडतात.

बदलत्या काळानुसार सातारा जिल्ह्यातील गावागावातील या कुटुंबाचे उदरनिर्वाहाचे साधन बदलले, रोजदारी व व्यवसायामध्ये बदल झाला, परंतु या साताराकर गावागावातील कुटुंबांची म्हसोबा देवस्थानाची श्रध्दा व भक्ती तसभूरही कमी झाली नाही. अद्याप सातारा जिल्हातील गावागावातील हिंदू कोलाटी जातीच्या मोरे, जावळे, लाखे, लघू जावळे आदी आडनावाची कुटुंबे प्रतिवर्षी म्हसोबाचे यात्रेच्या निमित्ताने येथे दहा, बारा दिवस राहूटी उभारीत वस्तीत राहतात.

या वर्षी सातारा,१०१ ब,झकामाठीपुरा येथील मोरकर परिवार या जत्रेचा मान घेऊन १६ जानेवारीपासून महाबळेश्वर मार्गे कोकणातून रायगड जिल्ह्यात अलिबाग तालुक्यात थेंरोडा येथे म्हसोबा देवाचा धार्मिक विधीसाठी आला आहे. थेरोंडा म्हसोबा देवस्थान येथे २७ जानेवारीला म्हसोबा देवाची जत्रा व मान विधी संपन्न झाला. सातारा, वाई पंचक्रोशीतील मोरकर परिवारातील पन्नास कुटुंबांनी लक्ष्मण बाळू माळी यांचे नेतृत्वात म्हसोबा देवाचा मान, पूजा अर्चा केली असून थेरोंडा बेडेकर आळीनजीकच्या शेतात तळ ठोकून राहुटी उभारून वस्तीस होते.

रितीरिवाजाप्रमाणे थेरोंडा आगळेची वाडी येथील देवस्थानात जत्रेचं नियोजन केले गेले. परंपरागत या कुटूंबाने सहपरिवारासह रेवदंडा समुद्र किनारी जाऊन देवाचे स्नान, आदी धार्मिक विधी पार पाडला. त्यानंतर या कुटूंबाने जत्रेच्या निमित्ताने थेरौंडा येथील म्हसोबा मंदिरात धार्मिक विधी पार पाडला. देवार्च मानपान पूर्ण केले. येत्या दोन दिवसात ही कुटूंबे खेड रत्नागिरी येथे प्रस्थान करणार आहेत. तेथील देवीच्या मानपानानंतर पुनश्च सातारा जिल्ह्यातील आपापल्या गावाला परततील.

# पोयनाड येथील क्रिकेट स्पर्धेत पोलिसांचा संघ विजेता



**अलिबाग : प्रतिनिधी**

झुंझार युवक मंडळ पोयनाडच्या वतीने देशाच्या ७७व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने सोमवारी (दि. २६) टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात येथील पोलिसांच्या संघाने व्यापारी असोसिएशन संघाचा १८ धावांनी पराभव करून विजेतेपद पटकावले.

स्पर्धेत पोयनाड विभागातील महावितरण कंपनीचा संघ आणि झुंझार वॉरियर्स या संघांनीही सहभाग घेतला होता. स्पर्धेचे उद्घाटन येथील तलाठी कार्यालयाचे माजी मंडळ अधिकारी तथा महाडचे विद्यमान नायब तहसीलदार महेश निकम आणि पोयनाड पोलीस ठाण्याचे एपीआय विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

स्पर्धा प्रथम साखळी व त्यानंतर बाद पद्धतीने खेळविण्यात आली. या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यापारी असोसिएशनच्या प्रीत चंद्रप्रकाश जैन याला मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज पोलीस संघाचे वितेश कवळे, तर उत्कृष्ट गोलंदाज म्हणून अमोल घरत यांची निवड करण्यात आली. विजेते संघ आणि खेळाडूंना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभास 'झुंझार'चे सचिव किशोर तावडे, खजिनदार दीपक साळवी, क्रीडा प्रमुख नंदकिशोर चवरकर, सदस्य अजय टेमकर, सुजित साळवी, पोयनाड व्यापारी असोसिएशनचे सदस्य किशोर जैन, प्रदीप जैन, ऋषिकुमार जैन, आर.डी. जैन, अक्षय अग्रवाल, विश्वकुमार नाईक, शैलेंद्र गायकवाड, ॲड. पंकज पंडित यांच्यासह व्यापारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# टी-२० वर्ल्डकपसाठी स्कॉटलंड संघ जाहीर

**लंडन :** टी-२० विश्वचषक २०२६ साठी पात्र ठरलेल्या स्कॉटलंड क्रिकेट संघाने आपल्या १५ सदस्यीय खेळाडूंची घोषणा केली आहे. बांगलादेशच्या जागी या स्पर्धेत प्रवेश मिळवणाऱ्या स्कॉटलंडच्या कर्णधारपदाची जबाबदारी अनुभवी फलंदाज रिची बेरिंग्टन याच्याकडे सोपवण्यात आली आहे. ओवेन डॉकिन्स यांच्या मार्गदर्शनाखाली हा संघ मैदानात उतरणार आहे. २००७मधील पहिल्या टी-२० विश्वचषकाचा भाग असलेल्या स्कॉटलंडचा हा सहावा विश्वचषक ठरणार आहे. विशेष म्हणजे २०२४च्या विश्वचषकासाठी पात्र ठरू न शकलेला हा संघ २०२२नंतर आता पुन्हा एकदा जागतिक व्यासपीठावर आपली ताकद दाखवण्यासाठी सज्ज झाला आहे.

# शांभवी वॉरियर्स पीपीएलचे मानकरी

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील पडम येथे प्रीमियर लीगचे (पीपीएल) आयोजन रायगड पेपर मिल ग्राउंडवर करण्यात आले होते. अटीतटीच्या झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात शांभवी वॉरियर्सने विजेतेपद पटकाविले. साईभाविक फायब्रिकेशन संघ उपविजेता ठरला.

स्पर्धेत वैयक्तिक बक्षिसांमध्ये मालिकावीर संदीप पाटील, उत्कृष्ट फलंदाज प्रथमेश टेमकर, उत्कृष्ट गोलंदाज हर्ष टेमकर, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक रमाकांत टेमकर, प्लेयर ऑफ द डे विदीप टेमकर यांची निवड करण्यात आली. विजेते संघ आणि खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास चंद्रकांत पाटील, अनंत चौलकर, नरेश टेमकर, विजय भोई, भालचंद्र टेमकर, चंद्रकांत टेमकर, मंगेश भाई, रमाकांत टेमकर, प्रेमनाथ भोई, जनार्दन भोई, सुधीर टेमकर, अनिल भोई, शंकर टेमकर, राजू पाटील, केतन टेमकर, अमोल टेमकर, शंतनु भोई, प्रजोत भोई, साहिल टेमकर, अक्षय चौलकर, ऋतिक पाटील, राज टेमकर, पियुष पाटील, शैलेश टेमकर, गणेश टेमकर, प्रणित टेमकर, संदीप पाटील आदी उपस्थित होते. संपूर्ण लीगचे समालोचन आदेश पोकळे व भाई पाटील यांनी केले.



# उर्वरित सामन्यांसाठी 'किवी' संघात बदल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताविरुद्ध सुरू असलेल्या टी-२० मालिकेतील उर्वरित दोन सामन्यांसाठी न्यूझीलंडच्या संघात बदल करण्यात आले आहेत. पाच सामन्यांच्या या मालिकेत भारतीय संघाने सध्या ३-० अशी विजयी आघाडी घेतली असून मालिकेतील शेवटचे दोन सामने विशाखापट्टणम आणि तिरुवनंतपुरम येथे खेळवले जाणार आहेत.

न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने चौथ्या टी-२० सामन्यापूर्वी वेगवान गोलंदाज क्रिस्टियन क्लार्क आणि टिम रॉबिन्सन यांना संघातून मुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. ते मायदेशी परतणार असून त्यांच्या जागी जिमी नीशम, लॉकी फर्ग्युसन आणि टिम सीफर्ट आता संघात दाखल झाले आहेत तसेच बिग बॅश लीगमध्ये खेळत असलेला सलामीवीर फिन लन २७ जानेवारी रोजी तिरुवनंतपुरममध्ये संघाशी जोडला जाईल.



**कामोठे :** रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल आणि ज्युनियर कॉलेजमध्ये प्रजासत्ताक दिनी शाळेचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. या सोहळ्याला नगरसेवक रवींद्र जोशी, नगरसेविका कुसुम म्हात्रे, शाळा समिती सदस्य राजेश गायकर, आशा भगत, सामाजिक कार्यकर्ते भाऊ भगत, 'रयत'चे पीआरओ बाळासाहेब कारंडे, संतोष गुजर, मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, प्राचार्य अविनाश कुलकर्णी, शाळेचे शिक्षक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.






**उलवे नोड :** देशाच्या ७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त रयत शिक्षण संस्थेचे कोपर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. गव्हाण येथील जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत मुख्याध्यापिका सुप्रिया पेणकर, प्राथमिक आरोग्य केंद्रात कामगार नेते महेंद्र घरत, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये भार्गव ठाकूर आणि ग्रामपंचायत येथे ग्रामसेवक विजय राठोड यांनी राष्ट्रध्वज फडकवला. या सोहळ्यास 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, माजी सरपंच माई भोईर, ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर, स्थानिक शाळा समितीचे चेअरमन भार्गव ठाकूर, विश्वनाथ कोळी, भाऊशेठ पाटील उपस्थित होते. त्यासोबतच ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, कामिनी कोळी, उषा देशमुख, कमलाकर देशमुख, किशोर पाटील, ग्रामविकास अधिकारी विजयकुमार राठोड, सुधीर ठाकूर, 'रयत'चे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, वसंतशेठ म्हात्रे, वामन म्हात्रे, जयवंत देशमुख, जिज्ञासा कोळी, शशिकांत ठाकूर, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्सना ठाकूर, राहुल घरत यांच्यासह पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**पनवेल :** येथील क्रीडा संकुलात प्रजासत्ताक दिनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. स्कॉलरशिप प्रोजेक्ट ऑफ महादेवा या मोहिमेत जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरीय असे निवड चाचण्यांचे टप्पे पूर्ण करणाऱ्या श्रेया बिरादार, श्रावणी सावंत आणि आलोकी पालवे या तीन खेळाडूंचा या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, नगरसेवक सुमित झुंझारराव, नगरसेविका डॉ. कविता चौतमोल, दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, राजश्री वावेकर, रूचिता लोंढे, अस्मिता घरत यांच्यासह शासकीय अधिकारी, नागरिक उपस्थित होते.



**पनवेल :** प्रजासत्ताक दिनानिमित्त हुतात्मा स्मारक येथे स्वातंत्र्यसैनिक कै. शांताराम अच्युत वालावलकर यांचे उत्तराधिकारी श्याम वालावलकर यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवून मानवंदना देण्यात आली. या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर, उपविभागीय अधिकारी पवन चांडक, तहसीलदार मीना भांबरे, महापालिका आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, नायब तहसीलदार जितेंद्र इंगळे, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल भगत, नगरसेविका रूचिता लोंढे, विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, स्वातंत्र्यसैनिकांचे उत्तराधिकारी, नागरिक उपस्थित होते.

**पनवेल :** भाजपच्या तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त पक्षाचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह आजी-माजी नगरसेवक आणि पदाधिकारी उपस्थित होते.





दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com